# पोलादपूर तालुक्यात पर्यावरण दिन ठरला प्रदूषण दिन

## प्रशासन रायगडावर अन् प्रदूषणकर्त्यांनी डाव साधला!

**पोलादपूर : प्रतिनिधी**

जगभरात पर्यावरण दिन म्हणून साजरा होत असताना पोलादपूर तालुक्यात मात्र प्रदूषण दिन ठरला आहे. शिवराजधानी रायगडावर राज्याभिषेक दिनाच्या नियोजनबध्द वर्धापनदिनासाठी पोलादपूर तालुक्यातील प्रशासन तत्परतेने रवाना झाले असताना प्रदूषणकारी असामाजिक तत्वांनी पोलादपूर तालुक्यात कापडे बुद्रुक व वाकण खांबेश्वरवाडी दरम्यान रसायनयुक्त सांडपाणी आणि आंबेनळी घाटातील कुंभळवणे फाटयाजवळ संरक्षक कठडयालगत सुमारे हजारभर रासायनिक घनकचऱ्याची पोती उघडयावरच टाकण्यात आल्याचे उघडकीस आले आहे.



चार वर्षांपूर्वी पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटालगत रासायनिक सांडपाणी टाकण्याचे प्रकार सातत्याने घडत असताना आता प्रदूषणकारी असमाजिक तत्वांनी आता पोलादपूर तालुक्यातील वाकण खांबेश्वरवाडीतील नदीपात्रालगत मोठया प्रमाणात रासायनिक सांडपाणी सोडल्याचे जागतिक पर्यावरण दिनी उघडकीस आले. यावेळी वाकण ग्रुपग्रामपंचायतीचे सरपंच जंगम यांनी दूषित पाण्याचे नमूने तपासण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र पितळवाडीकडे सोपविण्यात आले असून या पाण्याच्या नमून्यांचा पिण्यायोग्य आहे अथवा कसे याबाबतचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर पाण्याचा पिण्यासाठी वापर करावा अथवा नाही याबाबत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती दिली.

पोलादपूर तालुक्यातील विविध नळपाणीपुरवठा योजनांच्या जॅकवेल नदीपात्रालगत असून काही विंधन विहिरींच्या पाण्यासही रासायनिक सांडपाण्याचा रंग आणि गंध तसेच चव येत असल्याने हे दूषित पाणी नागरिकांच्या आरोग्यास हानीकारक असण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील पोलादपूर वाई सुरूर रस्त्यावरील आंबेनळी घाटाच्या कुंभळवणे फाटयाजवळ संरक्षक कठडयालगत दरीच्या बाजूला सुमारे हजारभर रासायनिक घनकचऱ्याची पोती उघडयावरच टाकण्यात आली असून यामध्ये रिऍक्टरमधील ऍश म्हणजेच राख असण्याची शक्यता आहे. पावसाळयात महाड औद्योगिक वसाहतीमध्ये वायू आणि जलप्रदूषण करणाऱ्या कंपन्यांनी पोलादपूर तालुक्याचा निसर्गरम्य आणि रासायनिक बाधा नसलेल्या स्वच्छ नदीपात्रांना लक्ष्य बनविले असून चार वर्षांपूर्वी हे प्रदूषणकर्ते कशेडी घाटामध्ये दरीतील उतारावर रासायनिक टँकर्स रिकामे करून पळ काढताना ढाब्यांवर पोलीस संरक्षणात सुरक्षित ठेवण्यात आले असल्याचे उघडकीस आले होते.

पोलादपूरच्या निसर्गरम्य वातावरणाला रसायनांची बाधा आणण्याचे काम ज्या समाजकंटकांनी केले आहे; त्यांनी जागतिक पर्यावरणदिनाचा मुहूर्त साधूनच प्रदूषण करायला सुरूवात केली आहे. शिवराजधानी रायगडावर राज्याभिषेक दिनाच्या नियोजनबध्द वर्धापनदिनासाठी पोलादपूर तालुक्यातील पोलीस, महसूल, आरोग्य व पंचायत समितीतील प्रशासन तत्परतेने रवाना झाले असताना पर्यावरण दिनाला प्रदूषण दिनामध्ये बदलणाऱ्या या केमिकल वेस्ट डिस्ट्रॉयर्सना शोधून कडक कारवाई करण्याचे आता पोलादपूर पोलीसांसमोर आव्हान उभे राहिले असून प्रशासनानेही नागरिकांच्या जिविताशी खेळणाऱ्या या प्रदूषणकारी समाजकंटकांविरूध्द कडक कारवाईचे हत्यार उपसण्याची गरज स्पष्ट झाली आहे.

# रायगड जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची आबाळ

## शिक्षकांची एक हजारांहून अधिक पदे रिक्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात जिल्हा परीषदेच्या शाळांमध्ये शिकणार्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची आबाळ सुरू आहे. जिल्ह्यातील शाळांमध्ये शिक्षकांची एक हजाराहून अधिक पदे रिक्त आहेत. महत्वाचे म्हणजे मुख्याध्यापकांची ७५ टक्के पदे रिक्त असून आठ तालुक्यातील शाळांमध्ये मुख्याध्यापकाचे एकही पद भरलेले नाही. शिक्षणासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रातील या अनागोंदीबाबत पालकवर्गात नाराजीचा सुरू आहे.

रायगड जिल्ह्यात अडीच हजाराहून अधिक जिल्हा परीषदेच्या प्राथमिक शाळां आहेत. या शाळांमध्ये मुख्याध्यापक, उपशिक्षक आणि पदवीधर शिक्षक असे मिळून ६ हजार २३१ पदे मंजूर आहेत. पण प्रत्यक्षात ५ हजार ५१३ पदे आजही रिक्त असल्याचे पहायला मिळते. जिल्ह्यात शिक्षकांचया रिक्तपदांची टक्केवारी १७.३ इतकी आहे. मुख्याध्यापकांची १११ पदे मंजूर असताना केवळ ३२ पदे भरलेली आहेत. महाड, माणगाव, म्हसळा , मुरुड, पेण, रोहा, श्रीवर्धन तळा या आठ तालुक्यात एकही मुख्याध्यापक कार्यरत नाही. एकीकडे खाजगी आणि इंग्रजी शाळांचे आक्रमण सुरू असताना दुसरीकडे सरकारी शाळांमधील शिक्षकांची कमतरता मुलांच्या शैक्षणिक भवितव्यावर परीणाम करणारे आहे.

**प्राथमिक शाळांमधील रिक्त पदे**

| पद | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| मुख्याध्यापक | १११ | ३२ | ८३ |
| उपशिक्षक | ५१८४ | ४५२० | ७२१ |
| पदवीधर | ९३६ | ६६३ | २७३ |

रायगड जिल्यात नवीन इंग्रजी माध्यमांची संख्या दरवर्षी वाढते आहे. शहराबरोबरच गावागावातील पालकांचा कल इंग्रजी मध्यम शाळांकडे वाढल्याने जिल्हा परीषदेच्या शाळांमधील पटसंख्या झपाट्याने कमी होवू लागली आहे.ग्रामीण भागातील शिक्षकांची कमतरता भरून काढताना शिक्षण विभागाची ओढताण होते आहे. ही कमतरता भरून काढण्यासाठी शासनाने सेवानिवृत्त मानधन तत्वावर नियुक्ती देण्याचा निर्णय घेतला होता परंतु त्याला अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. पटसंख्या कमी झाल्याने अनेक दोन शिक्षकी शाळा एकशिक्षकी झाल्या आहेत.यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे.

जिल्हा परीषदेच्या शाळांचा विस्तार मोठा असल्याने विद्यार्थी गुणवत्तेच्या अनुषंगाने केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांनी त्यांचया कार्यक्षेत्रातील जिल्हा परीषद शाळांना भेटी देणे आवश्यक असते. परंतु ही पदे देखील मोठया प्रमाणावर रिक्त आहेत. केंद्र प्रमुखांची २२८ पदे मंजूर आहेत. त्यातील ५० टक्के म्हणजे ११४ पदे स्पर्धा परीक्षेतून भरायची आहेत.

**शासनाने जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी नवीन शिक्षण संच धोरण आणले आहे. या धोरणानुसार प्राथमिक शाळांमधील सहावी ते आठवीच्या वर्गासाठी शिक्षकांची संख्या कमी होणार आहे. या ठिकाणी शिक्षक अतिरिक्त होणार असल्याने पुढील काही दिवसात शिक्षकांची कमतरता भरून निघेल अशी आशा आहे.-पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी, प्राथमिक**

# रेवदंडा एसटी बसस्थानक खड्ड्यात; अपघातास निमंत्रण



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा बसस्थानक पुर्णतः खड्डेमय झाले असून एस.टी. बसस्थानक आवारात मोठे खड्डे अपघातास निमत्रंण देत आहेत.

रेवदंडा बस स्थानक आवारात पडलेले खड्डे आता मोठे झाले आहेत, गेले दिवसात अचानक पडलेल्या पावसाने ही खड्डयाची तळी झाली होती. ऐन पावसाळ्यात येथून जा-ये करताना एस.टी. बसेस तसेच इतर लहान वाहने यांना खुपच त्रासदायक असते तरप्रवासीवर्गास धोकादायक ठरते. खड्डाच्या खोलीचा अंदाज येत नसल्याने छोटी मोठी वाहने तसेच एस.टी. बसेस जोरदारपणे आपटलेजातात, व आतील प्रवासाना धक्का सहन करावा लागतो.

रेवदंडा बस स्थानक अलिबाग, रोहा व मुरूड तालुक्याला मध्यवर्ती ठिकाण आहे. या तिन्ही तालुक्यातील गावागावात रेवदंडा बसस्थानकातून एस.टी. बसेस जा-ये करत असतात, यामुळे प्रवासीवर्गाची गर्दी नेहमी बस स्थानकामध्ये व आवारात असते. तसेच मध्यवर्ती ठिकाण असल्याने येथून मुंबई, पुणे, ठाणे आदी ठिकाणच्या लांब पल्लाच्या ठिकाणी जाण्यासाठी प्रवासीवर्गास रेवदंडा बसस्थानक सोयीचेअसते. तिन्ही तालुक्यातील बस डेपोतील एस.टी. बसेस नित्याने रेवदंडा बसस्थानकामध्ये गर्दी असते.

रेवदंडा बसस्थानक आवारातील खड्डेमय रस्ता एस.टी. बसचालकांनी डोकेदुखी ठरत आहे.या रेवदंडा एस.टी बसस्थानकांच्या आवारातील रस्त्याची दुरूस्ती व नुतनीकरण होईल असा आशावाद प्रवासीवर्ग व एस.टी. बसेस चालकवर्ग यांना होता. रेवदंडा बसस्थानक आवारातील रस्तयाची संबधीतानी त्वरीत दुरूस्ती व नुतनीकरण करावे अशी मागणी प्रवाशीवर्ग करीत आहे.

# करंजाडेमध्ये गुरू अर्जन यांचा शाहिदी दिवस



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुरु अर्जन हे एकूण दहा शीख गुरुंपैकी पाचवे होते . त्यांनी आदि ग्रंथ नावाच्या शीख धर्मग्रंथाची पहिली अधिकृत आवृत्ती संकलित केली, जी नंतर गुरु ग्रंथ साहिबमध्ये विस्तारली. शीख धर्मात शहीद झालेल्या दोन गुरूंपैकी त्यांना पहिले मानले जाते. १ जून रोजी गुरु अर्जन यांचा शहिदी दिवस नागरिकांना सरबत्त देऊन साजरा केला.

खुसरो मिर्झाच्या नेतृत्वाखाली झालेल्या बंडाला पाठिंबा दिल्याचा आरोप करून मुघल सम्राट जहांगीरच्या आदेशानुसार गुरु अर्जन यांना अटक करण्यात आली. त्यांना इस्लाम धर्म स्वीकारण्यास सांगण्यात आले, मात्र यांनी नकार दिला आणि परिणामी १६०६मध्ये मृत्युदंड देण्यात आला. त्यांचे हौतात्म्य शीख धर्माच्या इतिहासातील एक निर्णायक घटना मानली जाते. शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीने प्रसिद्ध केलेल्या नानकशाही दिनदर्शिकेनुसार मे किंवा जूनमध्ये हा गुरु अर्जन यांचा शहिदी दिवस म्हणून स्मरणात ठेवला जातो.

करंजाडेमध्ये कुलदीप सिंह, जसपाल सिंह, अंकीत सिंह, दिलबाग सिंह, जितेंद्र नागपाल, कंवलजीत सिंह, कुलबीर सिंह, जसबीर सिंह, गुरमित सिंह, गुरुदेव सिंह, मनिंदर कौर, कुलवंत कौर, अवतार सिंह, तिरलोचन सिंह आणि करंजाडे शिख संगत कार्यक्रमात सहभागी झाले. होते.

### दरवाजा उघडा राहिला नि घात झाला

**नवी मुंबई : बातमीदार**

माहेरी आलेल्या महिलेचे घरातून ३ लाख ३२ हजारांचे दागिने चोरीला गेल्याची घटना घडली आहे. घराचे दार उघडे असताना चोरांनी ही संधी साधली. नेरुळ गाव येथे १ जूनला ही घटना घडली असून, नेरुळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.उरण येथे राहणाऱ्या शोभना म्हात्रे या नेरुळमधील माहेरी आल्या होत्या. रात्रीच्या वेळी दरवाजा उघडा राहिला असता चोराने ३.३२ लाखांचे दागिने पळविले.

# भाजपचे जेष्ठ नेते बाळासाहेब मंडलिक यांचे निधन

**पेण : प्रतिनिधी**



भारतीय जनता पक्षाचे पेण शहराचे माजी सरचिटणीस प्रमोद मोरेश्वर उर्फ बाळासाहेब मंडलिक यांचे अल्पशा आजाराने पुणे येथे दुखःद निधन झाले. मृत्यूसमई ते ७६ वर्षांचे होते.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे संस्थापक अध्यक्ष, बिंदू माधव जोशी याचे प्रमोद मंडलिक हे सहकारी होते. पेण येथील दिनदयाळ पतसंस्थेचे संचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ स्वयंसेवक व विविध सामाजिक संस्थामध्ये ते कार्यरत होते.

प्रमोद मंडलिक यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. पेण एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव बाळासाहेब जोशी, पेण नगर परिषदेचे भाजप गटनेते अनिरुद्ध पाटील, भाजपचे अनिल ढेरे यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला.

# महावितरणचा विद्युत सुरक्षा सप्ताह

**कल्याण : प्रतिनिधी**

महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त 'शुन्य अपघात महावितरण, शुन्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन राज्यभरात १ ते ६ जून दरम्यान वीज सुरक्षा सप्ताह साजरा होत आहे. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी शुक्रवारी (०६ जून) कल्याण परिमंडल, चार मंडल कार्यालये, दहा विभाग कार्यालये तसेच ४० उपविभागीय व १८१ शाखा कार्यालयांमध्ये ४ हजार १८१ नियमित व बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनी वीज सुरक्षेची शपथ घेतली. यात २ हजार ६४२ नियमित कर्मचारी तर १ हजार ५३९ कंत्राटी कामगारांचा समावेश आहे.

या सप्ताहात अधिकारी-कर्मचाऱ्यांमार्फत मॅरेथॉन, रॅली, चित्रकला व निबंध स्पर्धा, रहिवाशी सोसायट्यांना भेटी अशा विविध माध्यमातून वीज सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली. शुक्रवारी सकाळी परिमंडल कार्यालयाच्या आवारात मुख्य अभियंता. मिश्रा यांच्या उपस्थितीत वीज सुरक्षेची शपथ घेण्यात आली. यावेळी अधीक्षक अभियंता अनिल थोरात, विजय फुंदे, स्थापत्य विभागाचे मोहन काळोगे, पायाभूत आराखडा विभागाचे महेश अंचिनमाने, चाचणी विभागाचे मंदार अत्रे, उपमुख्य अधिकारी रामगोपाल अहिर, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी अजित इगतपुरीकर व अधिकारी उपस्थित होते.

# धाटाव औद्योगिक वसाहतीतील रस्ते बिकट; अपघाताचा धोका

**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक वसाहतीतील एमआयडीसीचा अनेक ठिकाणी खोदकाम व विविध कामे चालू आहेत. खोदकाम करण्यासाठी आणलेले मशनरी बंद अवस्थेत रस्त्यावरच उभी आहे . त्यात पाऊस मोठा प्रमाणावर पडत असल्यामुळे सर्वत्र चिखल व पाणी साचलेला आहे. हा रस्ता रहदारीचा असल्यामुळे असल्याने अपघाताचा धोका वाढलेला आहे



निलिकॉन व एफडीसी कंपनीच्या वळणावरच ओलगतच लाईटचा पोल आहे अशा ठिकाणी भला मोठा खड्डा काही दिवसापासून दिसत आहे परंतु हे अद्याप हे काम ठप्प आहे. हा खोदकाम करण्यासाठी आणलेले मशनरी बंद अवस्थेत रस्त्यावरच उभी आह .या मशनरीच्या बाजूने जाण्यासाठी अनेक कारखान्यांना किंवा गावांना प्रमुख जोडणारा रस्ता आहे . हजारो नागरिक कारखान्यातून घराकडे ये जा करत असतात . त्यात गेल्या काही दिवसापासून मुसळधार पावसामुळे नाले तुडुंब वाहत असल्यामुळे पाणीदेखील रस्त्यावर येत आहे .

वळणावरच बंद मशीन असल्यामुळे समोरचे वाहन दिसत नसल्याने व रस्त्यावरच चिखल साचल्यामुळे कामगार त्या मार्गावरून प्रवास करताना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे . त्यामुळे प्रशासनाने तात्काळ ही बंद मशनरी कार्यरत करावी व पडलेला भला मोठा खड्डा कॉंक्रिटी करून रस्ता सुस्थितीत करावा अशी मागणी देखील कामगार करीत आहेत .

भर पावसात काही ठिकाणी खड्डे खोदण्याचे काम चालू आहे त्यामुळे सर्वत्र दुर्दशा झाल्याचे मिळत आहे.

# विखुरलेल्या पाखरांची तब्बल ३८ वर्षांनंतर भेट!

## दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळा उत्साहात, जुन्या आठवणींना उजाळा

**विटा (सांगली) : प्रतिनिधी**

किती सुंदर असतो तो क्षण जेव्हा शालेय वयातील मित्र-मैत्रिणी अनेक वर्षांनी पुन्हा एकत्र येतात... वेगवेगळ्या वाटांवर चाललेली ही पाखरं पुन्हा एकदा एकत्र गोळा झाली आणि मनात दडून बसलेल्या आठवणींना एक नवा श्वास मिळाला... निमित्त होते सांगली जिल्ह्यातील माहुली येथील महात्मा गांधी विद्यालयातील दहावीच्या १९८७च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळ्याचे. प्रेम आणि आपुलकीच्या बंधामध्ये हा हृद्य सोहळा मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा झाला.



गेल्या वर्षभरापासून काही जणांच्या मनामध्ये विचार घोळत होता की, आपल्या दहावीच्या जुन्या सवंगड्यांना एकत्र आणले पाहिजे, एकमेकांची ख्याली खुशाली विचारली पाहिजे. मग काही मंडळी कामाला लागली. म्हणतात ना, लोग आते गये, और कारवाँ बनता गया. मग त्यांनी वॉटस्ऍपवर ग्रुप बनविला आणि चर्चा सुरू झाली.

चंद्रकांत कुंभार, अजित देशमुख, प्रकाश बाबर, नानासाहेब पवार, शिक्षक डी.एस. भोसले, अण्णा जगताप या काही जणांनी त्यासाठी पुढाकार घेतला आणि विचार पुढे आला की, पहिला स्नेहमेळा प्रकाश बाबर यांच्या वलखड येथील फार्महाऊसवर घेऊया. तारीख ठरली ३ जून सायंकाळी ६ वाजता. या कार्यक्रमासाठी मटणाचा खास बेत आखण्यात आला होता. बघता बघता ३५ जण या स्नेहमेळ्यासाठी हजर राहिले. बरेच जण अडचणींमुळे येऊ शकले नाहीत, पण ही सुरुवात होती... हेही नसे थोडके.

जस जसे विद्यार्थी पोहचू लागले तस तसे काही जणांना गहिवरून आहे. सर्वजण एकामेकांना आलिंगन देत विचारपूस करू लागले. थोड्याफार जणांना ओळखण्यासाठी मेंदूलाही थोडा जोर द्यावा लागत होता. सायंकाळी सर्व जण एकत्र आल्यावर ७ वा. स्नेहमेळ्यास सुरुवात झाली. माहुली गावचे अजित देशमुख यांनी प्रस्तावना केली आणि सर्व १९८७च्या बॅचच्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आजच्या धावपळीच्या युवात थेट संवाद हरवत चालला आहे. बरेच दिवसांपासून मनात होते की, सर्वांनी एकत्र आले पाहिजे आणि तो दिवस आज आला. सर्वांना पाहून फारच समाधान आणि आनंद झाला आहे. भविष्यात काही अडचणीतील मित्रांना मदत करण्यासाठी काही निधी जमा करूया, असेही विचार त्यांनी या वेळी व्यक्त केले.

या स्नेहमेळ्याकरिता खास चंद्रकांत कुंभार हे आबुधाबीवरून गावी आले होते. त्यांनाही आपल्या गावची ओढ गप्प बसू देत नव्हती, तर शेजारील चिखलहोळ गावचे रशिद मुलाणी हे सध्या ठाणे येथे पोलीस सब इन्स्पेक्टर आहेत. त्यांनाही याबाबत माहिती मिळाली आणि ते लगोलग या कार्यक्रमासाठी खासकरून उपस्थित राहिले.

या वेळी शिक्षक शिवाजी माळी बोलताना म्हणाले की, आमचे शिक्षक आम्हाला सांगायचे की, कुठलेही व्यसन शरीरासाठी फार वाईट असते अन् तेव्हापासून मी व्यसनापासून लांबच राहिलो. एवढा बदल अशा शिक्षकांमुळेच होऊ शकतो.

राजेंद्र बारसिंग यांनीही आपले मत या वेळी व्यक्त केले की, आता आपला मोठा ग्रुप तयार झाला असल्याने एखादा चांगला उपक्रम आपण सुरू करू शकतो तसेच जिथे आपण शिकलो, त्या शाळेचे ऋणही आपण विसरता कामा नये. त्यासाठी आपणास काही करता येईल का? यावरही सर्वांनुमते विचार व्हायला हवा, असेही ते म्हणाले

प्रकाश बाबर, चंद्रकांत कुंभार, अजित देशमुख, नानासाहेब पवार, शिक्षक डी. एस. भोसले, अण्णा जगताप, एस.के. माने, रशिद मुलाणी, सयाजी कोरडे यांनीही त्यावेळच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. शशिकांत बारसिंग व्यस्त वेळापत्रकामुळे उपस्थित राहू शकले नाही, परंतु त्यांनी आपल्या शुभेच्छा आवर्जुन दिल्या. त्यावेळचे शिक्षण, एनसीसी कॅम्पची धमाल, दहावीचा अभ्यास तसेच शिंदे सर, रावताळे सर, ससे सर, थोरात सर, जाधव मॅडम आणि सर यांच्याविषयीही कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या वेळच्या स्नेहमेळाव्यासाठी महिला येऊ शकल्या नाहीत. म्हणून सर्वांनुमते पुन्हा मोठ्या प्रमाणात स्नेहमेळा जिथे आपले शिक्षण झाले त्या महात्मा गांधी विद्यालय, माहुली येथे घेण्याचे ठरले. सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतल्यावर पुन्हा लवकरच भेटू अशी मनाशी खूणगाठ बांधून एकमेकांचा निरोप घेतला.

# ‘द सायकल सभा’ पनवेल मनपाचा अभिनव उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्यावतीने गुरूवारी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली माझी वसुंधरा अभियान व पर्यावरणदिनानिमित्त ‘द सायकल सभा’ हा नाविन्यपूर्ण अभिनव उपक्रम आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आला. या वेळी ‘पर्यावरणाच्या दृष्टीने सायकलचे महत्व’ या विषयावर आधारित विशेष चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले तसेच सायकलिंगच्या विविध प्रतिनिधींना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



या कार्यक्रमाला सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, पर्यावरण विभाग प्रमुख प्रफुल घरत, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सायकलचा वापर हा आरोग्यदायी जीवनशैलीसाठी महत्वपूर्ण आहे. याबरोबर पर्यावरणपूरक वाहतुकीचा एक प्रभावी पर्याय आहे, ज्यामुळे प्रदूषणही कमी होते व गर्दी कमी होते. हा संदेश नागरिकांना देण्यासाठी माझी वसुंधरा उपक्रमांतर्गत उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्यावतीने सायकल रॅलींचे आयोजन करण्यात येत असते. या कार्यक्रमात महापालिका कार्यक्षेत्रातील सुमारे दहाहून अधिक सायकलिंगच्या विविध गटांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पर्यावरण संरक्षण, शाश्वत जीवनशैली व हरित वाहतूक यावर माहितीपूर्ण चर्चा यावेळी करण्यात आली. तसेच यावेळी उपस्थित सायकलिंगच्या विविध गटांच्या प्रतिनिधींना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

**पर्यावरणाच्या दृष्टीने सायकल चालवल्यामुळे होणारे फायदे**

✻ संपूर्ण शरीराचा व्यायाम होतो. हृदय मजबूत होते, रक्ताभिसरण सुधारते, स्नायू ताठर व मजबूत होतात. त्यामुळे फिटनेस राखण्यासाठी सायकलिंग खूप उपयुक्त आहे.

✻ मानसिक तणाव कमी होतो. सायकल चालवताना मेंदूला ऑक्सिजन मिळतो, नैसर्गिक वातावरणात मन प्रसन्न राहतं. यामुळे तणाव, चिंता व नैराश्य कमी होण्यास मदत होते.

✻ इंधनाची बचत होते. सायकल चालवताना पेट्रोल किंवा डिझेल यांचा उपयोग लागत नाही. त्यामुळे इंधनाची बचत होते आणि परावलंबित्व कमी होते.

✻ पर्यावरण रक्षण होते. सायकल चालवल्यामुळे प्रदूषण होत नाही. यामुळे हवामान स्वच्छ राहते आणि कार्बन उत्सर्जन कमी होते. ही एक पर्यावरणपूरक वाहतूक पद्धत आहे.

✻ पैशांची बचत होते. इंधन, पार्किंग फी, वाहनाची देखभाल या गोष्टींवरचा खर्च सायकलमुळे वाचतो.

# क्रिप्टो गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणारा आरोपी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

क्रिप्टो करन्सीमध्ये मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका महिलेकडून तब्बल १ कोटी ३ लाख रुपये उकळणार्या सायबर चोराला पनवेल सायबर सेलने मुंब्रा येथून अटक केली आहे. जुबेर शमशाद खान (३४) असे या सायबर चोराचे नाव आहे. त्याने अशाच पद्धतीने अनेकांना कोट्यवधींचा गंडा घातल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. त्यानुसार सायबर सेलकडून या आरोपीची कसून चौकशी करण्यात येत आहे.




या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपी जुबेर खान याने २०२० मध्ये फेसबुकवर पैसे कमविण्यासंदर्भातील एक जाहिरात टाकली होती. या जाहिरातीला भुलून खारघरमधील ५३ वर्षीय महिलेने जुबेर खानशी संपर्क साधला होता. त्यावेळी जुबेर खान याने त्यांना दोन अ‍ॅप डाऊनलोड करण्यास सांगून त्यांना वेगवेगळ्या क्रिप्टो टोकन्समध्ये गुंतवणूक करण्यास सांगितले होते. त्यानुसार या महिलेने ३ ऑक्टोबर २०२० ते २५ मार्च २०२५ या कालावधीत आपले घर विकून तसेच वडिलांच्या सेवानिवृत्तीमधुन आलेली अशी एकूण १ कोटी ३ लाख रुपयांची रक्कम जुबेर याच्या वेगवेगळ्या बँक खात्यात पाठवली होती.

# भाजप नेते बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ७ व ८ जून रोजी पनवेल तालुक्यातील खारघर, कळंबोली, कामोठे तसेच ग्रामीण पनवेल परिसरात विविध ठिकाणी भव्य सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



पनवेल येथे युवा खेळाडूंसाठी बास्केटबॉल स्पर्धा, कामोठे येथे उद्योजकांसाठी संवाद मेळावा, तसेच रक्तदान शिबिर, इयत्ता दहावी व बारावीतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी जपत गरजू नागरिकांसाठी मोफत अन्नधान्य कीट वाटप, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर छत्री वितरण, रिक्षाचालक बांधवांसाठी सीएनजी कूपन वाटप तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी गरम पाण्याच्या पिशव्या (हॉट वॉटर बॅग) वाटप यांसारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत.

यासोबतच ८ जून रोजी संध्याकाळी ५ वाजता खास मातृशक्तीसाठी प्रसिद्ध निवेदक क्रांती नाना मळेगावकर आणि बालगायिका, टीव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर यांच्या सहभागातून खेळ रंगला पैठणीचा या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केंद्रीय विहार मेट्रो स्टेशनच्या खालील पार्किंग परिसरात सेक्टर १२ खारघर येथे करण्यात आले आहे.

# विवाहित महिला बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक विवाहिता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

आरती अनिल राठोड (२२ रा.गणेशवाडी, पळस्पे) असे नाव असून उंची ४ फुट ५ इंच, बांधा सडपातळ, रंग गोरा, चेहरा गोल, केस काळे वाढलेले असून अंगात ब्ल्यू रंगाचा पंजाबी ड्रेस परिधान केलेला आहे. सोबत रेडमी कंपनीचा मोबाईल फोन आहे. तिला बंजारा, हिंदी, कन्नड भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सहा.पो. उपनि हनुमंत आहिरे यांच्याशी संपर्क साधावा.

# उरण नगर परिषदेतर्फे कापडी पिशव्या वाटप व वृक्षारोपण

**उरण : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून उरण नगरपरिषद तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या माध्यमातून उरणमध्ये पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. उरण नगरपरिषदेच्या कार्यालयात विविध शाळा कॉलेजमधील विद्यार्थी,नागरिक, सफाई कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी यांच्या उपस्थितीत पर्यावरण संरक्षण व प्लास्टिकचे वापर टाळणे या विषयावर मार्गदर्शन झाले.



या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी डॉ. विक्रांत भालेराव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्लास्टिकच्या पिशव्या वापरल्याने मानवी जीवनावर कसा घातक परिणाम होतो हे उदाहरणासह सांगून प्लास्टिक वापरण्याचे टाळावे,प्रशासनाच्या पर्यावरण उपक्रमात विविध कार्यक्रमात सहभागी व्हावे, प्रत्येक व्यक्तीने पर्यावरण संरक्षणात महत्त्वाचे भूमिका निभवावे असे आवाहन करीत त्यांनी उपस्थित सर्वांना प्लास्टिक न वापरण्याचे व पर्यावरणाचे संरक्षण करण्याची शपथ दिली.

याप्रसंगी उपस्थितांना कापडी पिशव्याचे वाटप करण्यात आले. त्यानंतर उरण नगरपरिषद परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.जनजागृतीचा एक भाग म्हणून अलिबाग मधील मिरर थेटर्स ग्रुपच्या कलाकाराने प्लास्टिक वापरू नका या विषयावर सुंदर असे पथनाट्य सादर करून रसिक प्रेषकांचे मने जिंकले. त्यानंतर उरण नगरपरिषद कार्यालय मधून उरण शहरात जनजागृती करण्याच्या उद्देशाने रॅली काढण्यात आली. झाडे लावा झाडे जगवा प्लास्टिक टाळा पर्यावरणाचे संरक्षण करा अशा घोषणा रॅली दरम्यान देण्यात आले. उरणमध्ये विविध ठिकाणी साफसफाई सुद्धा करण्यात आली. अशा प्रकारे विविध उपक्रमांचे,आयोजन करून उरण नगरपरिषद उरण व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून उरणमध्ये जागतिक पर्यावरण दिन साजरा केला.



## संपादकीय

# समृद्धीचा महामार्ग

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे लोकार्पण गुरुवारी इगतपुरी येथे पार पडले. सुरुवातीच्या काळात विरोध आणि गैरसमजांमुळे चर्चेत आलेला हा प्रकल्प आता यशस्वीरित्या पूर्ण झाला आहे. हा महामार्ग म्हणजे राज्याच्या आर्थिक समृद्धीचा महामार्ग असल्याचे उद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले आहेत.

**महायुतीचे सरकार २०१४मध्ये राज्यात आल्यानंतर समृद्धी महामार्ग प्रकल्पाचे स्वप्न पाहिले गेले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा ड्रीम प्रोजेक्ट होता. सुरुवातीला अनेकांनी या प्रकल्पाला विरोध केला. पण भूसंपादनासाठी मोबदल्याचे दर जाहीर झाल्यानंतर मात्र शेतकऱ्यांचा विरोध दूर झाला. सुरुवातीच्या काळात काही अपघातांमुळे या महामार्गाविषयी गैरसमजही निर्माण झाले. विरोधकांनी त्यातूनही राजकारण साधले. त्यामुळे या गैरसमजांमध्ये भर पडली, परंतु प्रत्यक्षात या महामार्गावरील प्रवासाचा अनुभव घेणारे लोक मात्र हा जलदगती प्रवास सुखकर असल्याचेच सांगत आले आहेत. काही महिन्यांपूर्वी या महामार्गावरून महिन्याला दोन लाख वाहने धावत होती, मात्र आता या महामार्गावरून दरमहा १० लाख वाहने प्रवास करतात. आता नागपूर ते मुंबई संपूर्ण ७०१ किमीचा महामार्ग सुरू झाल्यामुळे जनतेच्या प्रतिसादात आणखी वाढ होईल हे निश्चित. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रिपदी असताना सुरू झालेल्या या प्रकल्पाचा अखेरचा टप्पा आता त्यांच्याच हस्ते पूर्ण झाला आहे. मुंबई–नागपूर समृद्धी महामार्गातील ७६ किमीच्या इगतपुरी ते आमणे या शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते इगतपुरी येथे गुरुवारी झाले. अखेरचा टप्पाही सुरू झाल्यामुळे आता मुंबई ते नागपूर हे अंतर आठ तासांत पार करता येणार आहे. पूर्वी या प्रवासाला १६ ते १८ तास लागत. महाराष्ट्र राज्य रस्तेविकास महामंडळाने ७०१ किमीच्या आणि ६१ हजार कोटी रूपये खर्चाच्या नागपूर–मुंबई समृद्धी महामार्ग प्रकल्पाचे काम हाती घेतले होते. ११ डिसेंबर २०२२ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते समृद्धी महामार्गाच्या पहिल्या टप्प्याचे (नागपूर ते शिर्डी) लोकार्पण करण्यात आले होते. त्यानंतर मे २०२३ (शिर्डी ते भरवीर) आणि मार्च २०२४ (भरवीर ते इगतपुरी)मध्ये आणखी दोन टप्प्यांचे लोकार्पण पार पडले. गुरुवारी शेवटचा चौथा टप्पा सुरू झाला. यामुळे इगतपुरी ते कसारा घाट अवघ्या आठ मिनिटांत पार करता येणार आहे. याआधी मुंबईहून नाशिकला जाताना चार तासांपेक्षा अधिक वेळ लागत होता. समृद्धी महामार्गामुळे आता ते अंतर अडीच तासात पार करता येईल. या महामार्गावरील शेवटचा टप्पा अत्यंत आव्हानात्मक होता. नागपूर ते इगतपुरी दरम्यान आजवर एकूण दोन कोटी ११ लाख ३४ हजार ३२२ वाहनांनी प्रवास केला आहे. या वाहनांच्या माध्यमातून पथकराच्या रूपाने सरकारी तिजोरीत १५३० कोटी रुपयांची भर पडली आहे. सुरुवातीच्या काळात या महामार्गावरील अपघातांवरून विरोधकांनी सरकारवर हल्लाबोल केला होता. अपघातांमागील मानवी चुका लक्षात न घेता अकारण महामार्गाच्या बांधणीत दोष असल्याची आवई उठवण्याचा प्रयत्नही झाला, परंतु महामार्गाची बांधणी गुणवत्तापूर्ण असल्याची ग्वाही तज्ज्ञ जाणकारांनी ठामपणे दिली. सलग सरळ रेषेतील या महामार्गावरील प्रवासात आव्हानात्मक काहीही नाही, परंतु वाहनाच्या स्थितीनुसार तसेच दिवस वा रात्र, तापमान, पाऊस आदींचा अंदाज घेऊन योग्य वेग राखणे मात्र अपेक्षित आहे.**

# अलिबाग–वडखळ महामार्गाचे चौपदरीकरण व्हायला हवे



**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्ह्यातून जाणाऱ्या मुंबई–गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी होणे हा नित्याचा भाग झाला आहे. त्याची बातमी असली तरी त्याकडे फारसे कुणी मनावर घेत नाही. आता अलिबाग–वडखळ मार्गावरदेखील वाहतूक कोंडी होऊ लागली आहे. अलिबाग ते वडखळ हा २९ किलोमीटर अंतराचा प्रवास फक्त ४५ मिनिटांचा आहे. यासाठी कधी कधी दोन तास लागतात. वाढत्या वाहतूक कोंडीच्या समस्येमुळे प्रवाशांचा तासन्तास खोळंबा होतो. त्यामुळे अलिबाग–वडखळ महामार्गाच्या चौपदरीकरणाची मागणी केली जात आहे. या मागणीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या मार्गाचे चौपदरीकरण व्हायलाच पाहिजे.

काही वर्षापूर्वी राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून या महामार्गाच्या चौपदरीकरणाचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता, परंतु पोयनाड भागातील व्यापाऱ्यांनी या चौपदरीकरणाला विरोध केला तसेच भूसंपादनासाठी लागणारा खर्च महामार्गाच्या कामापेक्षा अधिक असल्याने हा प्रस्ताव बारगळला. अलिबाग–विरार बहुउद्देशीय मार्गिका प्रकल्प याच परिसरातून प्रस्तावित असल्याने अलिबाग–वडखळ मार्गाच्या चौपदरीकरण थांबले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून हा रस्ता आता सार्वजनिक बांधकाम विभाग राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे हस्तांतरीत केला गेला, मात्र रस्ता हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याचे सांगत राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याच्या देखभाल दरूस्तीकडे दुर्लक्ष केले आहे. दोन विभागांच्या वादात रस्त्याची दुरवस्था होण्यास सुरुवात झाली आहे.

अलिबाग हे रायगड जिल्ह्याचे मुख्यालय आहे. येथे जिल्हा रुग्णालय आहे, न्यायालय आहे, जिल्हा परिषद, पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, कोषागार तसेच विविध शासकीय विभागांची मुख्यालय येथे आहेत. आपल्या शासकीय कामांसाठी हजारो लोक जिल्ह्याच्या कानाकोऱ्यातून दररोज अलिबागला येतात.

अलिबाग हे पर्यटनस्थळ आहे. त्यामुळे पर्यटक अलिबागला येतात. पूर्वी केवळ उन्हाळ्यात लोकं अलिबागला यायची. आता पावसाळ्यातदेखील पर्यटक अलिबागला मोठ्या प्रमाणात येतात. सुट्टीच्या दिवशी अलिबाग आणि मुरूड तालुक्यात साधारणपण पंचवीस हजारहून अधिक पर्यटक येत असतात. त्यामुळे या वडखळ–अलिबाग आणि अलिबाग–मुरुड मार्गावरील वाहनांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढते. अरुंद रस्त्यांमुळे दोन्ही मार्गांवर वाहतूक कोंडीची समस्या उद्भवते. याचा फटका स्थानिकांसह पर्यटकांना बसतो.



पनवेलहून वडखळपर्यंत वाहनाने ४५ मिनिटांत माणूस पोहचतो. पुढे प्रवास रखडतो. जेएसडब्लू कंपनी, धरमतर खाडी पूल, शाहबाज, पेझारी नाका, तीनविरा, कार्ले खिंड, वाडगाव, पिंपळभात, चेंढरे बायपास येथे प्रचंड वाहतूक कोंडी होते. अलिबग–वडखळ मार्गावर वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या वाढली आहे. दर शनिवार रविवारी तसेच सुट्टीच्या दिवशी वाहतूक कोंडी होते. २९ किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी दीड ते दोन तासांचा कालावधी लागतात. त्यामुळे या महामार्गाचे तातडीने चौपदरीकरण करा, अशी मागणी केली जात आहे.

अलिबाग ते वडखळ मार्गावर वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. सध्या अस्तित्वात असलेला मार्ग हा अरुंद आहे. त्यामुळे सुट्टीच्या दिवशी २५ मिनिटांचे अंतर पार करण्यासाठी दीड ते दोन तासांचा कालावधी लागतो आहे. त्यामुळे या महामार्गाचे चौपदरीकरण व्हायलाच हवे. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी भाजप जिल्हा संघटक सतिश धारप यांनी केली आहे. ती रास्त आहे.

अलिबाग–वडखळ हा मार्ग पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे होता, त्यानंतर हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे गेला. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून हा रस्ता आता पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभाग राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे हस्तांतरीत केला गेला. रस्ता हस्तांतरणाची प्रक्रीया पूर्ण झाली नाही. त्यामुळे या रस्त्याचे काम कुणी करावे हा वाद आहे. शासनाने हा वाद मिटवून अलिबाग–वडखळ रस्त्याचे चौपदरीकरण करायला हवे. अलिबाग–विरार बहुउद्देशीय मार्गिका प्रकल्प होईल तेव्हा होईल, परंतू अलिबाग–वडखळ मार्गाचे चौपदरीकरण तातडीने व्हायला हवे. हे करत असताना कमीत कमी विस्तापन होईल याची दक्षता घायला हवी.



## बदलते तंत्रज्ञान

# तुमचा जुना फोन तुम्हाला तुरुंगात टाकेल, खबरदारी घ्या



जुना स्मार्टफोन विक्री करण्याच्या विचारात असाल तर जरा थांबा. कारण, तुम्हाला थेट तुरुंगवास होऊ शकतो. तुम्ही काहीही चूक नसताना फसले जाऊ शकतात. तुम्ही म्हणाल, जुना फोन विकल्याने तुरुंगवास का होणार आणि कशामुळे? तर याचीच माहिती आज आम्ही तुम्हाला देणार आहोत, चला तर मग याविषयीची माहिती पुढे जाणून घ्या.


आजच्या काळात स्मार्टफोन हा आपल्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग बनला आहे. नवीन फोन लाँच होताच आपला जुना फोन कमकुवत आणि कालबाह्य दिसू लागतो. आपण अनेकदा आपला जुना मोबाइल विकून नवा फोन खरेदी करण्याचा विचार करतो. बरेच लोक ऑनलाइन प्लॅटफॉर्म किंवा परिचितांना फोन विकतात आणि त्या पैशात थोडी भर घालतात आणि नवीन फोन घेतात. पण तुम्हाला माहित आहे का की ही सवय तुम्हाला तुरुंगात टाकू शकते.

आपण कोणताही कायदेशीर दस्तऐवज तयार न करता आपला जुना स्मार्टफोन एखाद्याला विकला आणि त्या फोनचा गैरवापर केला गेला – जसे की धमकी पाठविणे, फसवणूक करणे किंवा दहशतवादी कारवायांमध्ये त्याचा वापर करणे – पोलीस प्रथम त्या फोनच्या खचएख क्रमांकाद्वारे आपल्यापर्यंत पोहचतील. कारण रेकॉर्डमध्ये तो फोन अजूनही तुमच्या नावावर रजिस्टर्ड आहे. अशा परिस्थितीत पोलीस तुमच्याविरोधात गुन्हा दाखल करू शकतात आणि कोर्टात स्वत:ला निर्दोष सिद्ध करणं अवघड होऊ शकतं.

तुम्हाला तुमचा जुना फोन विकायचा असेल तर आधी कायदेशीर कागदपत्र तयार करणं गरजेचं आहे. त्यासाठी स्टॅम्प पेपरवर 'सेल ऑफ ॲग्रीमेंट' करावा लागेल. त्यामध्ये खालील माहितीचा समावेश असावा : विक्रेता आणि खरेदीदाराचे नाव, पत्ता व स्वाक्षरी, फोनचा खचएख नंबर आणि मॉडेल नंबर, विक्री दिनांक आणि पेमेंट मोड (रोख, ऑनलाइन किंवा धनादेश), फोनचे स्टेटस आणि किंमत नमूद करा

हा एक कायदेशीर करार आहे जो आपण स्थानिक नोटरी किंवा वकिलाच्या मदतीने करू शकता. याला सेलर–बायर ॲग्रीमेंट म्हणतात आणि त्यातून फोन कोणत्या तारखेला, कोणत्या व्यक्तीला विकला गेला हे सिद्ध होते. भविष्यात फोनमधून काही चुकीची गोष्ट येत असेल तर या डॉक्युमेंटच्या माध्यमातून तुम्ही स्वत:ला सुरक्षित ठेवू शकता.

# बालसाहित्यिक गोपीनाथ तळवलकर



**निमित्त**

प्रसिद्ध बालसाहित्यिक अशी गोपीनाथ गणेश तळवलकर यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म २९ नोव्हेंबर १९०७ रोजी मध्य प्रदेशातील मंडला या गावचा. पहिली पाच–सहा वर्षे त्यांना फक्त हिंदीचीच ओळख होती. पुढे पुण्याला आईवडिलांबरोबर आल्यावर त्यांना मराठीची ओळख झाली. त्यांचा आज स्मृतिदिन.

मॅट्रिक झाल्यानंतर महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षाचे शिक्षण घेण्यासाठी गोपीनाथ तळवलकर डोंबिवलीत राहण्यास आले. तथापि घरच्या परिस्थितीमुळे त्यांना महाविद्यालयीन शिक्षण पुरे करता आले नाही. वर्षे संपण्याच्या आत ते पाचोरा, जळगाव अशा ठिकाणी शिक्षकाची नोकरी करण्यासाठी गेले. कविता वाचाव्या व काही कविताही कराव्या असा त्यांचा वेळ जात होता. त्यांना ओढ होती ती पुण्याची. तळवलकर यांची ही पुण्याला राहण्याची इच्छा पुरी झाली ती कै. वासुदेव गोविंद आपटे यांच्यामुळे. ते 'आनंद' हे मुलांचे मासिक चालवत होते.

आनंद हे मासिक १९०६ साली आपटे यांनी सुरू केले. आपटेंनंतर गोपीनाथ तळवलकर व नंतर संपादिका श्यामला शिरोळकर यांच्या संपादकत्वाखाली या मासिकाची वाटचाल चालू राहिली. गोपीनाथ तळवलकर हे ३५ वर्षे या मासिकाचे संपादक होते.

'गोपीनाथ आनंदात असतात' ही आचार्य अत्रे यांची नेहमीची कोटी होती, ते खरोखरच नेहमी आनंदात असत.

आकाशवाणीवरील बालप्रिय बालोद्यान या कार्यक्रमातील गोपीनाथ तळवलकर. तळवलकर हे पुणे केंद्रावर बालविभागप्रमुख होते. बालोद्यान हा मुलांचा कार्यक्रम ते आयोजत. दर रविवारी सकाळी १० वाजता बालगोपाळांच्या गच्च उपस्थितीत हा कार्यक्रम होत असे.

बालसाहित्यासह प्रौढ साक्षरांसाठीही त्यांनी लिखाण केले. कणिका, खंडकाव्य, बालकविता असे विविध काव्यप्रकार हाताळूनही त्यांचे नाव झाले नाही. आकाशमंदिर, छायाप्रकाश, नंदिता या कादंबऱ्या, ज्ञानेश्वरीतील सौंदर्यविश्व हे रसग्रहण तसेच मुलांसाठीची अनेक पुस्तके त्यांनी लिहिली होती. त्यांचे काही लिखाण 'गोपीनाथ' या टोपणनावाने केलेले आहे. गोपीनाथ तळवलकर यांचे ७ जून २००० रोजी निधन झाले.

आनंद मासिकाचे संपादक, आकाशवाणीवरील बालोद्यान कार्यक्रमातील नाना, ख्यातनाम बालसाहित्यिक अशा अनेकविध नात्यांनी मुलांमध्ये रमलेल्या गोपीनाथ तळवलकरांच्या आठवणी म्हणजे सहस्रधारा. या आत्मचरित्रात आत्मगौरव, आत्मसमर्थन, अहंकार यांचा स्पर्शही नाही. लेखकाच्या ऋजू व्यक्तिमत्त्वासारख्याच सौम्य, शीतल प्रवाहाने नटलेल्या आहेत या सहस्रधारा. गोपीनाथरावांनी प्रौढसाक्षरांसाठीही लिखाण केले, पण त्यांचा भर बालसाहित्यावरच राहिला. त्यांना स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन. त्यांच्या स्मृती कायमच मनात दाटून राहतील.

**निवडक पुस्तके**

आकाशमंदिर (कादंबरी), आनंदभुवन, आशियाचे धर्मदीप, चंदाराणी (बालसाहित्य), छायाप्रकाश (कादंबरी), तव चरणी ही अञ्जली, दुर्वांकुर, नंदिता (कादंबरी), मराठी शब्द रत्नाकर, लिंबोणीच्या झाडाखाली (बालसाहित्य), वसंत सेवा, शांतिनिकेतन, ज्ञानेश्वरीतील सौंदर्यविश्व (रसग्रहणात्मक पुस्तक) (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# दररोज भिजवलेले ड्रायफ्रूट्स खाल्ल्यास अनेक फायदे

कोलेस्ट्रॉल हा एक प्रकारचा मेणासारखा पदार्थ आहे जो शरीराच्या सर्व पेशींद्वारे तयार केला जातो. हे शरीरासाठी आवश्यक आहे, परंतु जेव्हा त्याचे प्रमाण जास्त होते तेव्हा यामुळे हृदयरोग, वजन वाढणे, हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक सारख्या समस्या उद्भवतात. कोलेस्ट्रॉलचे दोन प्रकार आहेत – एलडीएल कोलेस्ट्रॉल आणि एचडीएल कोलेस्ट्रॉल.



एलडीएल कोलेस्ट्रॉल शरीरात मेणाचे प्रमाण वाढवते, तर एचडीएल कोलेस्ट्रॉल (चांगले कोलेस्ट्रॉल) मेणाचे प्रमाण कमी करण्यास मदत करते. म्हणूनच, उच्च प्रमाणात एलडीएल कोलेस्ट्रॉल टाळणे आणि एचडीएल कोलेस्ट्रॉलचे कमी प्रमाण वाढविणे खूप महत्वाचे आहे. आज आम्ही तुम्हाला पाच ड्रायफ्रूट्सबद्दल माहिती देणार आहोत, जे खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यासाठी भिजवून खाल्ले जातात.

अक्रोडमध्ये ओमेगा–३ फॅटी सिड, प्रोटीन, फायबर आणि मॅग्नेशियम असते. अक्रोड शरीरातील साखरेचे प्रमाण कमी करण्यास मदत करते ज्यामुळे कोलेस्टेरॉलशी संबंधित समस्या उद्भवतात.

बदामामध्ये व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, फायबर आणि प्रथिने असतात. बदामामध्ये असलेले अल्फा–लिनोलेनिक सिड एक प्रकारचे ओमेगा–३ फॅटी सिड आहे, जे कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते.

मनुकामध्ये नैसर्गिक शर्करा असते जी खराब कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यास मदत करते. याशिवाय मनुकामध्ये व्हिटॅमिन सी, कॅल्शियम आणि फायबर देखील असते.

काजूमध्ये फायबर, मॅग्नेशियम आणि प्रथिने असतात. काजूमध्ये असलेल्या अनेक गुणधर्मांमुळे कोलेस्टेरॉल कमी होण्यास मदत होते.

खजूरमध्ये व्हिटॅमिन, फायबर, अमिनो सिड, फॉस्फरस, पोटॅशियम आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असतात, जे खराब कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात.

**(येथे दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

# मोरबे धरण कृती समितीचे मंत्री गणेश नाईक यांना साकडे

चौक : प्रतिनिधी



आपल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी मोरबे धरण कृती समितीचे अध्यक्ष आणि सदस्य यांनी मंत्री गणेश नाईक यांची भेट घेऊन कैफियत मांडली.

खालापूर तालुक्यातील मोरबे हे धरण सुरुवातीला जे एन पी टी या बंधारासाठी बांधण्यात येत असल्याचे सांगण्यात येते, त्या नंतर ते धरण सिडको यांनी ताब्यात घेऊन नवी मुंबई महानगर पालिका यांना राज्य सरकारने विकले, पण जे आठ महसूली गावे आणि आठ आदिवासी वाड्या यांची जमीन या धरणासाठी कवडीमोल किमतीने संपादन करण्यात आली असून अद्याप नागरी सुविधा पासून वंचित ठेवण्यात आले आहे. सर्व जमीन घेतल्याने शेती नाही त्यामुळे उपजिविकेचे साधन गेले, आणि प्रकल्पग्रस्त यांना नोकरी पासून दूर ठेवल्याने बेकारी वाढून उपासमारीची वेळ आली आहे,

त्यामुळे संघर्षाचा लढा उभारून जगू अथवा मरू असे उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा शेवटचा निर्णय घेण्यात येत असल्याचे कृती समितीचे कार्याध्यक्ष परशुराम मुरकुटे यांनी सांगितले. ते म्हणाले मंत्री गणेश नाईक हे न्याय देण्याच्या भूमिकेत असून त्यांना अधिकारी वर्ग चुकीची माहिती देत आहेत, त्यामुळे समोरासमोर बैठक घेण्यासाठी लवकरच आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली मंत्री गणेश नाईक यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठकीसाठी प्रयत्न होत असल्याचे सांगितले.

# श्रीवर्धनमधील एसटी बससेवा खंडित

## प्रवाशांचे हाल; शटल व विनाथांबा फेऱ्यांची मागणी

श्रीवर्धन : प्रतिनिधी

श्रीवर्धन आगारातून मागील काही दिवसांपासून मध्यम व लांब पल्ल्याच्या तसेच माणगावमार्गे जाणाऱ्या ग्रामीण एसटी फेऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कपात करण्यात आली आहे. परिणामी श्रीवर्धन तालुक्यातील अनेक प्रवाशांना आपल्या दैनंदिन प्रवासासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. एसटीच्या या अनियमित सेवेचा फटका विशेषतः कामानिमित्त, आरोग्य सेवेसाठी, शिक्षणासाठी व अन्य अत्यावश्यक कारणांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना बसत आहे.

सध्या केवळ सकाळी श्रीवर्धन–मिरज बस, दुपारी सव्वाअकराची आणि सायंकाळी सहाची श्रीवर्धन–महाड बस उपलब्ध आहे. याखेरीज मधल्या वेळात कोणतीही बससेवा उपलब्ध नसल्यामुळे प्रवाशांची गैरसोय वाढली आहे. महाड, माणगावसारख्या ठिकाणी जाण्यासाठी वेळेवर बस न मिळाल्यामुळे अनेक वेळा खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. याचा थेट परिणाम प्रवाशांच्या खर्चावर आणि वेळेच्या व्यवस्थापनावर होत आहे.

श्रीवर्धन बसस्थानकातून पनवेल, वडखळ, मुंबई या मार्गांवर नियमित व विनाथांबा सेवा, तर माणगाव व महाड मार्गांवर शटल सेवा सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, शटल सेवा सुरु केल्यास प्रवास अधिक सुलभ व वेळेत होईल, एसटी प्रशासनाने आर्थिक उत्पन्नात घट झाल्याचे कारण देत बसफेऱ्या बंद केल्या असल्या, तरी प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेता तात्काळ पर्यायी व्यवस्था उभारणे गरजेचे झाले आहे. स्थानिक प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनीही ही बाब वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली असून, जनतेच्या मागणीकडे गांभीर्याने पाहून लवकरच निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# माथेरानमध्ये पर्यावरण दिनी वृक्षारोपण

माथेरान : बातमीदार

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त माथेरान गिरीस्थान नगरपालिकेच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये एक पेड माँ के नाम मोहिमे अंतर्गत माथेरान मधील अनेक भागात वृक्षारोपण करण्यात आले.जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन करून कागदी व कापडी पिशव्यांचा वापरकरावा असे सुद्धा आवाहन यावेळी करण्यात आले.

जागतिक पर्यावरण दिवसाचे औचित्य साधून माथेरान गिरीस्थान नगरपालिकेच्यावतीने येथील मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपालिका अधिकारी, कर्मचारी आणि येथील नागरिक यांनी विविध ठिकाणी माझी वसुंधरा अभियान ६.० व एक पेड माँ के नाम या मोहिमे अंतर्गत येथील विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाप्रसंगी स्वच्छ सर्वेक्षण आणि माझी वसुंधरा अभियान हरित शपथ व जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन अंतर्गत स्वच्छ भारत,हरित भारत अशी प्रतिज्ञा घेण्यात आली.तसेच

माथेरान परिसरातील विविध भागात सिंगल युज प्लास्टिक बंदी बाबत जनजागृती करण्यासाठी फलक लावण्यात आलेले आहे. सदरील कार्यक्रमास पालिका कार्यालय अधीक्षक सदानंद इंगळे,लेखापाल भारत पाटील,कर निर्धारण अधिकारी समीर दळवी, रचना सहाय्यक करुणा बांगर,लिपिक प्रवीण सुर्वे,जयवंत वर्तक,स्नेहा साखळकर, अन्सार महापुळे, ज्ञानेश्वर सदगीर आणि कर्मचारी वर्ग आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.




# मधयुक्त फुलझाडे लावून पर्यावरण दिन साजरा

माणगाव : प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिन छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला.

पर्यावरणाची होणारी हानी, जंगलतोड व वाढते प्रदूषण रोखण्यासाठी वृक्षांची जोपासना करणे अत्यंत आवश्यक आहे. तापमान वाढ रोखण्यासाठी वृक्ष आवश्यक आहेत. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षांचे महत्त्व ओळखून ५ जून हा दिवस पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्यात येतो.या दिनाचे औचित्य साधून विद्यालयातील शिक्षक , विध्यार्थी वर्गासहित सर्वांनी वृक्षारोपण मोठ्या उत्साहात केले.या निमित्ताने विद्यालय परिसरातील विविध फुलझाडी वृक्षांची लागवड करण्यात आली.

माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष प्रशांत सुतार, शिक्षक राजेंद्र भगत, बाळासाहेब गायकवाड, अजित शेडगे, शिक्षकेतर कर्मचारी प्रदीप लांगी, राज पतारे विद्यार्थी व मान्यवर उपस्थित होते.



विद्यालयाच्या परिसरात विविध प्रकारचे वृक्ष लागवड व संवर्धन करून विद्यार्थ्यांनी हिरवाई निर्माण केली आहे.पर्यावरण दिनानिमित्त एक विध्यार्थी एक झाड उपक्रमाचे पालक व पर्यावरण प्रेमींनी कौतुक केले आहे.सर्व मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, पर्यावरण दिनानिमित्त आपल्या शाळेत/संकुलात या सप्ताहात पुढील उपक्रम राबवावेत

शाळेतील विद्यार्थी व पालकांशी संवाद साधून त्यांना कचऱ्याचे वर्गीकरण, विशेषतः प्लास्टिकचा वापर टाळणे, प्लास्टिकचे पुनर्वापर या संदर्भात कृतीशील उपक्रम घेऊन माहिती देण्यात येणार आहे. तसेच शाळेच्या आवारात किमान पाच मधयुक्त फुलझाडे लाऊन पर्यावरण जतन संवर्धनासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.


**पाहिजेत**

**नामांकित प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सी मध्ये पनवेल या ठिकाणी एक जागा भरणे आहे.**

| पदनाम | संख्या |
| --- | --- |
| १) सिक्युरिटी सुपरवायझर | ०१ |

अनुभवास प्राधान्य दिले जाईल/( Ex- Army)

मोबाईल नं. : ७०२०८९६३५३, ९६६५५३२९५०


# कर्जत दहिवलीमधील चौकाचे मल्हार चौक नामकरण

कर्जत : प्रतिनिधी




निसर्गसंपन्न कर्जत शहरात वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण रक्षणासाठी शिवसेना नेहमीच सजग राहिली आहे. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शिवसेनेच्या वतीने एक स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला. माजी नगरसेवक ड संकेत भासे यांच्या नेतृत्वाखाली दहिवली परिसरात शेकडो वृक्षांची लागवड करण्यात आली आणि त्याच्या संगोपनाची जबाबदारी देखील शिवसैनिकांनी घेतली. यावेळी दहिवली येथील चौकाचे ' मल्हार चौक' असे नामकरण करण्यात आले.

पर्यावरण रक्षणाचा संदेश देत 'वृक्ष हीच खरी संपत्ती' हा मंत्र घेऊन शिवसैनिकांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा आदर्श निर्माण केला. 'कर्जत शहराचं निसर्गसौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने झाडे लावण्याची आणि त्यांचे संगोपन करण्याची गरज आहे.' असे मत ड संकेत भासे यांनी व्यक्त केले.

या उपक्रमानिमित्त दहिवली येथील एका महत्त्वाच्या चौकाचे नामकरण 'मल्हार चौक' असे करण्यात आले. जेष्ठ नागरिकांच्या सूचनेनुसार या चौकाला नवसंजीवनी देत ड. संकेत भासे यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा संपन्न झाला. हा उपक्रम केवळ एकदिवसीय नव्हे तर सातत्याने राबवला जाणार असल्याचेही शिवसेनेच्या वतीने सांगण्यात आले. अशा उपक्रमांद्वारे पर्यावरण संवर्धनाबरोबरच सामाजिक जागृती घडवून आणण्याचा उद्देश असल्याची प्रतिक्रिया शिवसैनिकांनी व्यक्त केली.

भाजप शहराध्यक्ष राजेश लाड आणि ऋषभ लाड, आदित्य लाड, कर्जत शहर प्रमुख पश्चिम संजय मोहिते, तालुका प्रवक्ते शिवसेना रमाकांत जाधव, उपशहर प्रमुख दिनेश कडू, युवासेना शहरप्रमुख सचिन भोईर, उपशहर प्रमुख प्रसाद डेरवणकर , शहर संपर्कप्रमुख सुदेश देवघरे, उपशहर प्रमुख प्रदीप वायकर, विभाग प्रमुख विशाल बैलमारे, सुहास दिघे, विनायक गायकवाड, आदित्य लाड, अजय सुवर्णे, वृषभ लाड, युवा सेना विभाग प्रमुख सौरभ केदारी, महिला उपशहर प्रमुख मानसी कदम, अपर्णा चव्हाण, खान भाई,गणेश लाड, मोरे मामा, भगवान लाड, रवी चव्हाण, दिलीप राठोड,राजेश चव्हाण, सुदीप राठोड, प्रेम भालेराव, रोहित राठोड, रोशन राठोड, योगेश थोरवे , सचिन खंडागळे, दीपक मोधळे, स्वप्निल जाधव आदी उपस्थित होते.

# रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघ अध्यक्षपदी जे.टी. पाटील

अलिबाग : प्रतिनिधी

रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघाच्या अध्यक्षपदी अॅड. जे.टी. पाटील यांची बिनविरोध निवडून आले. दिलीप जोशी यांची उपाध्यक्षपदी, योगेश मगर यांची सचिवपदी बिनविरोध निवड करण्यात आली. रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी बुधवारी (दि. ४) सभा घेण्यात आली. सहाय्यक निबंधक डॉ. स्मिता गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा घेण्यात आली. तीन पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज आल्यामुळे अध्यक्षपदी अॅड. जे.टी. पाटील, उपाध्यक्षपदी दिलीप जोशी, सचिवपदी योगेश मगर बिनविरोध निवडून आल्याचे डॉ. स्मिता गायकवाड यांनी जाहीर केले. .



# माणगावमध्ये विजांचा लखलखाट अन् ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस

माणगाव : बातमीदार

माणगावमध्ये शुक्रवार दि.६ जून रोजी सकाळचे सुमारास ऊन्हाची तिरीप पाडत अचानक दुपारी दीड वाजता काळोख करुन वाऱ्यासह वीजांचा लखलखाट व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस कोसळल्याने परिसरात पाणी साचले, तास भर बरसल्यानंतर तो पुन्हा शांत झाला आणि क्षणात खडखडीत उन पडत विचीत्र लहरी वातावरण दिसून आले. मे महिन्यात सुरु झालेला अवकाळी पाऊस आता थांबण्याची चिन्ह दिसत नाहीत कारण खरा पावसाळा आता सुरु झाला आहे.



आता रविवार दिनांक ८ जुनला मृग नक्षत्र निघत आहे. बळीराजाची पेरणीची लगबग असते. परंतु या वर्षी अनपेक्षितपणे पाऊस मे महिन्यातच जुन जुलै महिन्यांप्रमाणे विक्रमी पाऊस झाल्याने शेतकऱ्यांसह सर्वांचीच तारांबळ उडवून दिली आहे.


**अलिबाग नगरपरिषद**
**आरोग्य विभाग**
**जाहिर निविदा सुचना**

अलिबाग नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडील निविदा सुचनेमध्ये अलिबाग नगरपरिषेच्या आरोग्य विभागार्करिता सोबत जोडलेल्या कामाची निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर निविदा सुचना अलिबाग नगरपरिषद कार्यालयात दिनांक ०९/०६/२०२५ पासून उपलब्ध आहेत. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल / सुधारणा असल्यास प्रसिध्द करणेत येईल.

| अ.क्र | कामाचा तपशील | कालावधी |
| --- | --- | --- |
| १ | अलिबाग नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकरिता माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत Cloth bag vending machine खरेदी करणेबाबत. | ०९/०६/२०२५ ते १७/०६/२०२५ |
| २ | अलिबाग नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकरिता माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत Power rodding machine खरेदी करणेबाबत. | |
| ३ | अलिबाग नगरपरिषदेकरीता जेसीबी वाहनाची दुरुस्ती करणेबाबत जाहीर फेर निविदा दुसरी वेळ मागविण्यात येत आहेत. | |

वरील प्रमाणे इच्छूक पुरवठादाराकडून विहित नमुन्यामध्ये ऑफलाईन पद्धतीन निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सादर करताना प्रत्येकाचे स्वतंत्र निविदा सादर करणे आवश्यक आहे. निविदे संबंधित अधिक माहिती अलिबाग नगरपरिषद आरोग्य विभागत उपलब्ध आहे.

जा.क्र.१४७६
दिनांक : ०४/०६/२०२५
अलिबाग नगरपरिषद

सही /-
(सचिन बच्छाव)
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलांनी मौजे मालढुंगे ता. पनवेल जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे मालडुंगे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सव्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) आकार |
| --- | --- | --- | --- | --- |
| मालडुंगे | शोभा सुरेश मुंगे<br>प्रसाद विश्वास आचरेकर | ८२ | २/अ/१ | ०-१६-३०<br>०-४३-७० |

सदर जमिन मिळकतीपैकी ०-२८-०० गुठे जमिनी बाबत जाहीर नोटीस

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा-या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हयाची नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/०६/२०२५
ठिकाण : पनवेल

सही/-
**अॅड. प्रधान मधुकर पाटील**
ऑफिस नं.१३५, पहिला मजला, नगर पालिका कॉम्पलेक्स, छत्रपती शिवाजी महाराजाचा पुतळ्याचा पुढे, पनवेल, जि. रायगड-४१०२०६,
मोबाईल. ९३२४३७५५०२

# जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट आवश्यक

## नवी मुंबईत ३० वर्षांपेक्षा जुन्या वास्तू धोकादायक म्हणून जाहीर

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील धोकादायक इमारतींचे सन २०२४-२५ या वर्षासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. सर्वेक्षणानंतर एकूण ५२७ इमारती धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६५(अ) नुसार ज्या इमारतींचा वापर सुरू होऊन ३० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे, अशा इमारतींचे नवी मुंबई महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून किंवा संरचना अभियंत्याकडून संरचना परीक्षण करून घेणे अनिवार्य आहे.



३० वर्षापेक्षा जास्त काळ इमारतीचा वापर किंवा इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र (पूर्ण अथवा अंशत:) क्षेत्रफळ वापराखाली आणले गेले अशा दिवसापासून मोजावयाचा आहे. नेमलेल्या संरचना अभियंत्याने शिफारशी केलेली दुरूस्तीची कामे पूर्ण झाल्याचे व ते बांधकाम सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र नवी मुंबई महानगरपालिकेकडे सादर करावे.

या प्रकारे संरचना परीक्षण करण्याचे उत्तरदायित्व जी संस्था ,मालक, भोगवटादार पार पाडण्यास टाळाटाळ करतील त्यांना रूपये २५,०००/- अथवा सदर मिळकतीच्या वार्षिक मालमत्ता कराची रक्कम यातील जी जास्त असेल तितक्या रक्कमेचा दंड ठोठवावयाची तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३९८ (अ) खाली अंतर्भूत करण्यात आलेली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने स्ट्रक्चरल इंजिनियर यांची यादी नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेली आहे.

३० वर्षापेक्षा जास्त काळ झालेल्या इमारतीचे संरचनात्मक परीक्षण दिनांक ३०.०९.२०२५ पूर्वी पूर्ण करून याबाबतचा अहवाल संबधित विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी किंवा सहाय्यक संचालक नगररचना, नवी मुंबई महानगरपालिका यांच्याकडे सादर करावयाचा आहे.

# मार्केटमध्ये कापडी पिशव्यांचे वाटप; प्लास्टिक प्रतिबंधात्मक जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदुषणाचे निर्मूलन या संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम यांनी जाहीर केलेल्या संकल्पनेनुसार विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहीमे अंतर्गत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून यामध्ये आज प्लास्टिक पिशव्या वापरु नये या विषयी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली व प्लास्टिकला पर्यायी कापडी पिशव्यांचे वितरण करण्यात आले.



अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे व संतोष वारुळे तसेच परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे व डॉ. कैलास गायकवाड यांच्या माध्यमातून विभाग अधिकारी तथा सहा.आयुक्त आणि त्यांचा अधिकारी - कर्मचारीवृंद यांच्या वतीने कापडी पिशव्या वाटपाचा वेगळा उपक्रम सर्व विभागांमध्ये राबविण्यात आला.

यामध्ये दिवाळे मच्छी मार्केट, नेरुळ से.२९ दैनंदिन बाजार, वाशी मार्केट, तुर्भे चाईल्ड लाईफ स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने एपीएमसी मार्केट व तुर्भे स्टोअर बुध्दविहार परिसर, कोपरखैरणे भाजीपाला, मटण व फिश मार्केट, घणसोली से.४ हावरे चौक मार्केट व ऐरोली विभागात से.५ जय भवानी मार्केट या ठिकाणी प्रतिबंधात्मक प्लास्टिक न वापरण्याविषयी जनजागृती करण्यात आली.

# आतड्यांसंबंधी गुंतागुंत असलेल्या बाळावर उपचार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये पूर्ण दिवसाच्या नवजात बाळामध्ये आयल पर्फोरेशन (लहान आतड्याच्या मध्यभागी एक छिद्र) आणि फेकल पेरिटोनिटिस ( पोटाचा तीव्र संसर्ग) सारखी दुर्मिळ स्थिती आढळून आली. नवजात शिशु तज्ज्ञ आणि एनआयसीयु विभागाचे प्रमुख डॉ. तन्मेष कुमार साहू यांच्या नेतृत्वाखालील या बाळावर यशस्वी शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करत या दुर्मिळ आजाराचे व्यवस्थापन करण्यात आले. वैद्यकीय कौशल्य आणि टीमवर्कचे उत्तम उदाहरण या ठिकाणी पहायला मिळाले असून या बाळाला नवे आयुष्य मिळवून देण्यात आले.



नवी मुंबईतील कामोठे येथे राहणाऱ्या सुहास आणि श्रध्दा राणे या जोडप्याला फेब्रुवारीमध्ये पहिली अपत्यप्राप्ती झाली. ही गर्भधारणा अगदी सुरळीतरित्या पार पडली असून आणि प्रसूतीपूर्व गुंतागुंत झाली नाही. मात्र, जन्मानंतर लगेचच साईशाला रडताना आणि श्वासोच्छवासादरम्यान त्रास होऊ लागला, ज्यामुळे तिला तात्काळ नवजात शिशु अतिदक्षता विभागात (एनआयसीयू) दाखल करावे लागले. पहिल्या दिवशीच बाळाचे पोट सुजले होते. एक्स-रेमध्ये न्यूमोपेरिटोनियम म्हणजे पोटाच्या पोकळीत वायू(गॅस) दिसून आला जे पूर्ण-मुदतीच्या नवजात शिशु मध्ये आढळणारी एक दुर्मिळ आणि गंभीर बाब होती.

# आदिवासी आश्रमशाळेला पाठ्यपुस्तक संच भेट

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका शाळांमधील इ. नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी वापरलेली पुस्तके संकलित करून त्याचे संच रयत शिक्षण संस्थेच्या आदिवासी आश्रम शाळांतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकरिता पाठविण्याचा अभिनव उपक्रम प्रभात ट्रस्ट या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून आज जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात राबविण्यात आला.



जागतिक पर्यावरण दिनाला अत्यंत साजेसा असा हा अभिनव उपक्रम 'थ्री आर' ही पर्यावरणपूरक संकल्पना जुन्या पुस्तकांचा पुनर्वापर करीत प्रत्यक्ष अंमलात आणणारा असून याव्दारे कागदी कचरा कमी होऊन पुस्तकांचा पुनर्वापरही होणार आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतून इ. नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांनी वापरलेल्या सुस्थितीतील पुस्तकांचे १ हजारहून अधिक संच देण्यात आले असून त्यामध्ये इतरही ठिकाणाहून संकलित केलेल्या पुस्तक संचांची भर घालत यावेळी विशेष वाहनाव्दारे वाडा, मोखाडा भागात रवाना करण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते मोखाडा आश्रम शाळेतील शिक्षक तुकाराम लोंढे यांनी प्रभात ट्रस्ट संस्थेचे प्रमुख डॉ.प्रशांत थोरात यांच्या उपस्थितीत ह्या पुस्तक संचांचा स्वीकार केला. आयुक्त महोदयांच्या हस्ते पुस्तकाने भरलेल्या विशेष वाहनाला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पावर व डॉ.राहुल गेठे, प्रशासन विभागाचे उपआयुक्त. शरद पवार, शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व.संतोष वारूळे आणि इतर अधिकारी तसेच प्रभात महिला बचत गटाच्या डॉ. आश्लेषा थोरात, सुनीता मोहिते उपस्थित होते.

यावेळी जुन्या कपड्यांवर पुनर्प्रक्रिया करून नवीन कपडा तयार केल्यानंतर त्यापासून प्रभात महिला बचत गटाद्वारे तयार करण्यात आलेली पिशवी मान्यवरांना भेट देण्यात आली..थ्री आर संकल्पनेला अत्यंत पूरक असणारा हा उपक्रम सुविधांचा अभाव असणा-या विद्यार्थ्यांना अत्यंत उपयोगी ठरणारा असून नवी मुंबईकर नागरिकांनीही या उपक्रमासाठी आपल्या विद्यार्थ्यांची वापरून झालेली पुस्तके द्यावीत असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले.

# उरण तालुक्यात वीर वाजेकर महाविद्यालयातर्फे वृक्षारोपण

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, महालण विभाग, फुंडे यांच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने उरण तालुक्यात विविध ठिकाणी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण करण्यात आले.



प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करा या २०२५ च्या जागतिक पर्यावरण दिनाच्या घोषवाक्याला अनुसरून, पर्यावरण रक्षण आणि प्लास्टिकविरहित जीवनशैलीसाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत दिघोडे येथील महात्मा गांधी विद्यालय, बापूजी देव मंदिर परिसर, खारपाटील महाविद्यालय चिरनेर आणि रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील हायस्कूल पिरकोन या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणासोबतच चिरनेर येथील बापूजी देव देवराई परिसरात स्वच्छता मोहिमाही राबविण्यात आली.

या कार्यक्रमास वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, उपप्राचार्य गजानन चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. राम गोसावी, राष्ट्रीय छात्र सेनेचे विभाग प्रमुख डॉ. राजकुमार कांबळे, यांच्यासह राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि स्वयंसेविका उपस्थित होते.

महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक फल्लेसर, खारपाटील हायस्कूलचे प्राचार्य पट्टेबहादूर, पिरकोन शाळा व्यवस्थापन समितीचे प्रमुख जीवन गावंड, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी निकेतन ठाकूर तसेच फ्रेंड्स ऑफ नेचर चिरनेर संस्थेचे दिनेश चिरनेरकर विविध ठिकाणी झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी झाले होते.महाविद्यालयाच्या वतीने चिंच, कडुलिंब, आवळा, पिंपळ आणि करंज अशी विविध प्रकारची सुमारे १०० झाडे लावण्यात आली.

# पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण




**नवी मुंबई : बातमीदार**

कॉमन सिटीजन असोसिएशन सेक्टर ४ नेरूळ शिवतेज मित्र मंडळ सानपाडा विवेकानंद संकुल यांच्यावतीने सानपाडा येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वरील सर्व संस्थांच्या वतीने शाळेच्या मैदानावर वृक्षारोपणाचा कार्यक्रम करण्यात आला. सदर कार्यक्रमांमध्ये कॉमन सिटीजन असोसिएशनचे हरीश इंगवले शिवतेज मित्र मंडळाचे सागर घाडगे, निलेश कचरे वृक्षप्रेमी आबा रणवरे विवेकानंद संकुलाचे मुख्याध्यापक विलास वावळ त्याचप्रमाणे सर्व विभागाचे मुख्याध्यापक उपस्थित होते.

सदर कार्यक्रमामध्ये शाळेचे माजी विद्यार्थी असणारे निलेश कचरे व सागर गाडगे यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. याप्रसंगी बोलताना निलेश कचरे यांनी शाळेने केलेल्या संस्काराचा भावी आयुष्याचा उपयोग होत असल्याचे सांगितले. कार्यक्रम प्रसंगी बोलताना कॉमन असोसिएनचे हरीश इंगवले यांनी झाडांचे महत्त्व ग्लोबल वॉर्मिंग त्याचप्रमाणे दैनंदिन पर्यावरणाच्या दृष्टीने काय आहे याचे स्पष्टीकरण केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य निर्माण केले त्या स्वराज्याचे आपण हरित स्वराज्य करू असा संकल्प केला. या कार्यक्रमांतर्गत जांभूळ कडुलिंब, पिंपळ, चिंच, आपटा अशा प्रकारच्या भारतीय वृक्षांचे रोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या आभार प्रदर्शनामध्ये निलेश कचरे यांनी सदर वृक्षांची नियमित देखभाल करण्यासाठी समिती गठीत करणार असल्याचे सांगितले त्याचप्रमाणे कार्यक्रमासाठी महानगरपालिका वृक्ष अधिकारी त्याचप्रमाणे विवेकानंद संकुल ज्येष्ठ नागरिक यांनी केलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार मानले

# गणेशोत्सवानिमित्त ठाणे रेल्वेस्थानकात दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या

**नवी मुंबई :बातमीदार**

गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर करण्याची ग्वाही खासदार नरेश म्हस्के दिली होती. त्यांच्या पाठपुराव्यामुळे गणेशोत्सवानिमित्त ठाणे रेल्वे स्थानकात कोकण रेल्वेच्या तिकीटासाठी दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या सुरु होणार आहे. खिडक्यांची संख्या वाढल्याने गणेशभक्तांची दमछाक कमी होणार आहे. अतिरिक्त खिडक्या वाढवल्याबद्दल खासदार नरेश म्हस्के यांचे कोकण रेल्वे प्रवासी संघटनेने आभार मानले आहेत.

गणेशोत्सव हा कोकणवासीयांचा जिव्हाळ्याचा विषय. नोकरी आणि उद्योगधंद्यानिमित्त लोखो कोकणवासिय ठाणे, नवी मुंबई, मुंबई आणि उपनगरांत स्थायिक झाले आहेत. कोकणी माणूस जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात असू द्या गणपतीला दरवर्षी तो गावी जातोच. गणपतीसाठी बहुसंख्य कोकणवासीय कोकण रेल्वेचा पर्याय निवडतात. मात्र आरक्षण खिडक्यांची नगण्य संख्या आणि लांब रांग यामुळे कोकणवासीय मेटाकुटीला येतात. ही बाब लक्षात घेऊन कोकण रेल्वे प्रवासी संघटनेने ठाणे रेल्वे स्थानकात आरक्षण तिकीट खिडक्या वाढवण्याची मागणी गेले ४ वर्ष लावून धरली होती. खासदार म्हणून निवडून आल्यानंतर संघटनेने ही मागणी नरेश म्हस्के यांच्याकडे करताच अवघ्या काही दिवसांतच हा प्रश्न मार्गी लागला आहे. प्रवासी संघटनेने समाधान व्यक्त केले आहे.

# श्री स्वामी समर्थ मठात गुरू चरित्र पारायण

**उरण : प्रतिनिधी**

उरण शहरातील आनंद नगर येथील श्री स्वामी समर्थ सेवासंघ येथे गुरुवार (दि. २९) मेपासून बुधवार (दि. ४) जूनपर्यंत गुरु चरित्र परायण सकाळी ९ ते ११ पर्यत सुरु होते. पारयण सात दिवस सुरु होते.

यामध्ये सात महिलांनी सहभाग घेतला होता गुरुवार ( दि.५ ) रोजी सांगता समारोप करण्यात आला. त्या निमित्ताने श्री स्वामिंच्या मठाचा ७ वा वर्धापन दिन शुक्रवार ( दि.६) जून रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# पंचायत समितीतर्फे पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण



**उरण : बातमीदार**

उरण पंचायत समिती तर्फे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात झाडे लावा झाडे जगवा, पर्यावरणाचे रक्षण करा असा संदेश देत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी जितेंद्र चिर्लेकर- प्रशासन अधिकारी, संपदा कटोर राकेश पाटील, सुजन पाटील, डॉ.भोजने, उल्हास पाटील , तेजस जोशी, मीनल मगर आदी अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.यावेळी विविध उपक्रम राबवून पंचायत समितीच्या माध्यमातून जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.




**स्टिल्ट + १० मजले निवासी इमारत**

| | |
|---|---|
| प्रोजेक्ट पत्ता | एफ.पी. नं. ३३५, गाव- चिपळे, टीपीएस-२, तालुका- पनवेल, जिल्हा - रायगड |
| भूखंड क्षेत्र | ९६०.०० चौ.मी. |
| विकासक | जय हिंद सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित (संपर्क व्यक्ती: ९३२००६६३६३) |
| आर्किटेक्ट | डिझाइन कॉन्सेप्ट, ए. आर. गीता दिनेश काटवे, कार्यालय क्रमांक १३८, पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुना पनवेल. |
| बांधकाम परवानगी क्रमांक | सिडको/नैना/पनवेल/चिपळे/ बीपी-००७११/सीसी/२०२५/ ११४८. दिनांक: २६.०५.२०२५ |

# श्रीवर्धनमध्ये मोकाट श्वानांचा कहर

## नागरिक धास्तावले; प्रशासनाने उपाययोजना करण्याची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात मोकाट व भटक्या श्वानांचा उपद्रव दिवसेंदिवस आटोक्यातून बाहेर जात असून नागरिकांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. रस्त्यांवर, चौकांमध्ये, बाजारपेठांमध्ये टोळ्यांमध्ये फिरणाऱ्या श्वानांनी परिसरात अक्षरशः दहशत माजवली आहे. एखादी दुचाकी किंवा चारचाकी गाडी रस्त्यावरून जात असताना त्याच्या मागे भुंकत धावणे तर सामान्य झाले आहे, पण आता हे श्वान थेट चालत्या नागरिकांवर हल्ले करण्याच्या टोकाच्या स्तरापर्यंत पोहचले आहेत.



२०२४-२०२५ या केवळ एका वर्षाच्या कालावधीत श्रीवर्धन तालुक्यात १८७ नागरिकांना श्वानदंशाचा त्रास सहन करावा लागला आहे. हे आकडे धक्कादायक असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात. जीवना बंदर परिसर, आराठी ग्रामपंचायत हद्द तसेच शहरातील मध्यवर्ती भागांत घडलेल्या घटनांमुळे नागरिक भयभीत झाले आहेत. काही दिवसांपूर्वी घडलेली घटना अधिकच अस्वस्थ करणारी आहे. सहा ते आठ मोकाट श्वानांनी एकाच महिलेला खेचत नेल्याची घटना शहरात घडली होती.

श्रीवर्धन नगर परिषद आणि संबंधित ग्रामपंचायती भटक्या श्वानांच्या निर्बिजीकरण मोहिमा, शस्त्रक्रिया व व्यवस्थापन करण्यात पूर्णपणे अपयशी ठरल्याचे स्पष्ट दिसते. याअगोदर जाहीर निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती, मात्र कुठलीही प्राणीमित्र संस्था किंवा वेलफेअर एजन्सी पुढे न आल्याने ही प्रक्रिया अर्धवट राहिली. यामुळे या संवेदनशील प्रश्नाची जबाबदारी पुन्हा एकदा नागरिकांवर टाकली गेली आहे.

वास्तविक हा मुद्दा केवळ नागरी असुविधा नसून लोकांच्या जीवितहानीचा गंभीर धोका बनला आहे. न्यायालयीन मार्गांचा अवलंब करूनही प्रशासनाला जबाबदारीचे भान आणावे लागेल का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

नगर परिषद व ग्रामपंचायतींनी तत्काळ मोकाट श्वानांविरोधात निर्बिजीकरण व स्थलांतर मोहिमा सुरू कराव्यात. श्वानहल्ल्यांमुळे जखमी झालेल्या नागरिकांसाठी तत्काळ वैद्यकीय मदत व नुकसान भरपाईची योजना राबवावी. अशा घटनांना रोखण्यासाठी स्वतंत्र दक्षता पथक तयार करून संध्याकाळी व रात्री गस्त वाढवावी. जिल्हा प्रशासन, श्रीवर्धन नगर परिषद व जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाने या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.

# खोपोलीत जोरदार पाऊस; खालापूर परिसर मात्र कोरडा

**खालापूर : प्रतिनिधी**

मोसमी पावसाने खोपोलीकरांना झोडपून काढले. सुमारे एक तास पडलेल्या पावसाने शहरातील रस्ते पाण्याखाली गेले होते. एकीकडे खोपोलीत जोरदार पाऊस पडला असताना खालापूर व आसपासच्या परिसरात पावसाचा थेंबही पडला नाही.

खोपोलीत मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील हायको कॉर्नर, म्युनिक माऊंट बिल्डिंग ते दुरक्षेत्र निगम बीएसएनएल कार्यालयासमोरील रस्त्यावर पाणी साठल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. एकेरी वाहतूक सुरू होती. शहरातील शास्त्रीनगर येथील गुरुद्वारासमोर मार्गावर पाणी साठले होते. अशीच अवस्था खोपोली शहरातील अनेक प्रभागात पहावयास मिळाली.

या पावसाने एक तास धो धो कोसळून खोपोलीकरांना धुवून काढले, मात्र आसपासच्या भागात तसेच खालापूर परिसरात पावसाचा थेंबही न पडल्याने खोपोलीत धो धो पाऊस कोसळत आहे हे संभाषण खालापूरकरांना चेष्टेचा विषय ठरला होता.



# चरई खुर्द ग्रामपंचायतीतर्फे वृक्षारोपण

**तळा : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने ५ जून रोजी एक पेड माँ के नाम या पंचायतराज मंत्रालय भारत सरकार यांच्या अभियान अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्द (ता. तळा) येथे वृक्ष लागवड कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



कार्यक्रमासाठी चरई खुर्द सरपंच प्रवीण आंबार्ले यांच्यासमवेत उपसरपंच लक्ष्मण भोईर, सदस्य अजय सावंत, ग्रामविकास अधिकारी राजेश खैरे, कर्मचारी विजय आंबार्ले, अंगणवाडी सेविका, मदतनीस, शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी सर्व उपस्थितांनी वृक्ष लागवड का आवश्यक आहे. त्याचे संवर्धन केले पाहिजे, ज्यामुळे पर्यावरणाचे रक्षण करता येईल हे समजून घेतले. प्रत्येकाची आता जबाबदारी आहे की एक पेड मॉ के नाम उपक्रमाला आपण सर्वांनी सहकार्य करून प्रत्येकाने एक तरी झाड लावून ते जगवले पाहिजे, असे सर्वांनी ठरविले.

# रायगडातील भात उत्पादक शेतकऱ्यांना बोनसची प्रतीक्षा

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याची ओळख भाताचे कोठार अशी कायम रहावी म्हणून शासन शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी विविध योजना कृषी विभागातर्फे कार्यान्वित करत असते. सध्या भातशेतीकडे लोकं दुर्लक्ष करीत आहेत, परंतु भातशेतीकडे लोकांनी पुन्हा आकर्षित व्हावे यासाठी शेतमालास हमी भाव व बोनस देऊन राज्य शासन शेतीकडे वळा यासाठी प्रयत्न करीत आहे. भातावर दरवर्षी एप्रिलअखेर मिळणाऱ्या बोनसची रक्कम अद्याप न मिळाल्याने शेतकरीवर्ग पेरणीसाठी थोडा फार आर्थिक हातभार लागेल या अपेक्षेने प्रतीक्षा करीत आहे.

कोकणात सर्वाधिक पीक हे भातशेतीचे घेतले जाते. कोकणाला ७२० किलोमीटरचा समुद्र किनारा असून येथे मासेमारी व त्याचबरोबर पारंपरिक शेतीचा व्यवसायसुद्धा मोठ्या प्रमाणात केला जातो. भातशेती उत्पादकांना गेल्या सात-आठ वर्षापासून भाताला हमी भाव देत असून भात खरेदी केंद्र तालुकानिहाय नियुक्त केले आहेत. जिल्ह्यात ३५हून अधिक भात खरेदी केंद्र कार्यरत आहेत.

गतवर्षी शासनाने भात उत्पादकांना प्रती हेक्टरी २० हजार बोनस दिला होता. हा लाभ दोन हेक्टरपर्यंत सिमित होता. यंदा बोनसची रक्कम रखडली आहे. प्रती हेक्टरी २५ हजार रुपये बोनस जाहीर केला गेला आहे, मात्र एप्रिल, मे दोन महिने उलटून गेले तरी अद्याप कोणतीही हालचाल दिसून न आल्यामुळे शेतकरीवर्ग पेरणीच्या मोसमात थोडीफार रक्कम बोनसच्या रुपात मिळेल या अपेक्षेने डोळे लावून बसल्याचे चित्र आहे.

याबाबत प्रगतशील शेतकरी दिनेश मिनमिने यांनी सांगितले की, आजची तरुण पिढी शेतीकडे आकर्षित होण्यासाठी व शेतकरी बंधू यांना दिलासा देण्यासाठी दरवर्षी शासनामार्फत बोनस दिला जातो. यंदासुद्धा शासनाकडून मोठ्या रक्कमेचा बोनस शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. भाताला हमी भाव दिल्यामुळे तसेच भात शेतकऱ्यांना बोनसही देत असल्यामुळे युवा पिढी शेतीकडे वळू लागली आहे. खरीप हंगामात शेतकरी अडचणीत आहे. शासनाने बोनस तातडीचे दिल्यास आर्थिक हातभार मिळेल.

दरम्यान, याबाबत जिल्हा पणन अधिकारी के.बी. ताठे यांनी सांगितले लवकरच शासनाकडून बोनस दिला जाईल. आमचे प्रयत्न सुरू आहेत.

# डीएमसीसी कंपनीत वृक्षारोपण मोहीम

**धाटाव : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त धाटाव औद्योगिक क्षेत्रातील डीएमसीसी कारखान्याने शासनाच्या ध्येय धोरणानुसार वृक्षारोपणाचा उपक्रम हाती घेतला. या उपकरणांतर्गत आपले रक्षण करण्यासाठी आणि परिसराला हिरवळ करण्यासाठी कंपनीकडून परिसरात १०१ वृक्षांची लागवड गुरुवारी (दि. ५) करण्यात आली, तर सकाळी कंपनी परिसरात वृक्षारोपणाच्या घोषणा देत प्रभात फेरी काढण्यात आली व वृक्षांचे महत्त्व सांगण्यात आले



या कार्यक्रमात आंबा, काजू, चिकू, फणस, बहावा, करंज, गुलमोहर, कांचन, बांबू अशा प्रकारच्या विविध वृक्षांचे रोपण करण्यात आले. या वेळी डीएसीसी कंपनीचे साईड हेड किरण हिंगणे यांनी बोलताना सांगितले की, माणसाच्या जीवनात वृक्षांचे महत्त्व अधिक किमतीचे आहे. त्यामुळे सर्वांनी या वृक्षारोपण उपक्रमात जास्तीत जास्त सहभाग घेऊन वृक्षारोपण केले पाहिजे. प्रत्येक झाड हे ऑक्सिजन निर्मित कारखाना आहे. त्यामुळे जास्तीत जास्त झाडे लावू, तेवढा जास्त प्रमाणात आपल्याला ऑक्सिजन मिळेल. खऱ्या अर्थाने जगाला जर हिरवेगार बनवायचे असेल आणि माणसाला दैनंदिन जीवनात ताजेतवाने व आनंदी व्हायचे असेल तर वृक्ष लागवड केलीच पाहिजे, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

कंपनीचे एचआर मॅनेजर अनिल जांभळे म्हणाले की, आज कंपनीच्या परिसरात वरिष्ठांच्या आदेशानुसार १०१ वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्षांची लागवड करत असताना ज्या पद्धतीने आम्ही लागवडीचे नियोजन केलेला आहे त्याच पद्धतीने त्या वृक्षाचे संगोपन, जतन करण्याचे आम्ही नियोजन केले आहे. याचा मथित अर्थ असा की, प्रत्येकाने वृक्षाचे रोपण करत असताना ते जबाबदारीने सांभाळले, तर निश्चितच उद्याचा आपला परिसर हिरवागार दिसेल .

या कार्यक्रमास सेफ्टी ऑफिसर अरुण माने, अकाउंट डिपार्टमेंटचे प्रभात पात्रो, मेडिकल ऑफिसर राकेश खांडेकर, निलेश शेंडगे, अनिकेत पाटील, संतोष सातपुते, अल्पेश बोय, स्मिता परातणे, कावेरी देशमुख यांच्यासह कंपनीचे विविध विभागांचे पदाधिकारी व कामगार उपस्थित होते.

# दोन एक्स्प्रेसच्या थांब्यांच्या वेळेत बदल

**रोहा : प्रतिनिधी**

सावंतवाडी रोड-दिवा एक्स्प्रेसला कळंबोली स्थानक येथे आणि तिरुवनंतपुरम नॉर्थ-भावनगर एक्स्प्रेसच्या रोहा स्थानक येथील थांब्याच्या वेळेत मध्य रेल्वेने बदल केले आहेत.

बदल करण्यात आलेल्या दोन गाड्यांमध्ये ट्रेन क्रमांक १०१०६ सावंतवाडी रोड-दिवा एक्स्प्रेस दिनांक ०२.६.२०२५पासून कळंबोली स्थानकावर सध्याच्या ७.२९ वाजताऐवजी ७ वाजता पोहचेल आणि ७.०१ वाजता सुटेल, तर ट्रेन क्रमांक १९२५९ तिरुवनंतपुरम नॉर्थ-भावनगर एक्स्प्रेस दिनांक ०५.६.२०२५पासून रोहा स्थानकावर सध्याच्या २०.०५ वाजताऐवजी ७.५५ वाजता पोहचेल आणि ७.५८ वाजता सुटेल.

प्रवाशांनी याची नोंद घ्यावी, अशी विनंती रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आली आहे. तपशीलवार वेळापत्रक आणि थांब्यांसाठी www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करा, असे मध्य रेल्वेकडून सांगण्यात आले आहे.

# सीआयएसएफ कर्मचाऱ्यांना एक कोटींच्या अपघात विम्याचा लाभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ) कर्मचाऱ्यांना पगार खात्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियासोबत केलेल्या सामंजस्य करारांतर्गत सैन्य दलाने सुरू केलेल्या नवीन लाभांतर्गत एक कोटी रुपयांपर्यंतच्या वाढीव वैयक्तिक अपघात विम्याचा लाभ घेता येईल, अशी माहिती सीआयएसएफ आरसीएफ थळ युनिटचे युनिट कमांडर संदीप चक्रवर्ती यांनी दिली.

सीआयएसएफ मुख्यालय, नवी दिल्ली येथे आयोजित एका समारंभात या सामंजस्य कराराला औपचारिक मान्यता देण्यात आली. सीआयएसएफच्या वतीने सुश्री रेखा नांबियार, उपमहानिरीक्षक, प्रशासन आणि सुश्री रंजना सिन्हा, महाव्यवस्थापक (एनआरआय आणि एसपी) यांनी २३ मे २०२५ ते २२ मे २०२८ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्रीय सशस्त्र पोलीस वेतन पॅकेज (सीएपीएसपी) अंतर्गत सेवारत आणि निवृत्त सीआयएसएफ कर्मचाऱ्यांच्या पगार खात्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय)सोबत झालेल्या सामंजस्य कराराला सीआयएसएफ मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात औपचारिक मान्यता देण्यात आली.

या सामंजस्य करारात सीआयएसएफ कर्मचाऱ्यांसाठी अनेक वाढीव आर्थिक लाभांचा समावेश आहे, जो सीआयएसएफच्या सदस्यांच्या कल्याण आणि आर्थिक सुरक्षेसाठीच्या चालू वचनबद्धतेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. हे फायदे दल सदस्यांसाठी शून्य खर्चात येतात आणि ते अतिरिक्त आहेत, असे निवेदनात म्हटले आहे.

तीन वर्षांच्या या सामंजस्य करारावर एसबीआयच्या वतीने सीआयएसएफच्या डीआयजी/प्रशासक रेखा नंबियार आणि एसबीआय कॉर्पोरेट सेंटर, मुंबई येथील जनरल मॅनेजर (एनआरआय आणि एसपी) रंजना सिन्हा यांनी स्वाक्षरी केली. सामंजस्य कराराच्या नवीन तरतुदींनुसार सीआयएसएफ कर्मचाऱ्यांसाठी विद्यमान वैयक्तिक अपघात विमा (पीएआय) ५० लाख रुपयांवरून एक कोटी रुपये करण्यात आला आहे. पेन्शनधारकांसाठी पीएआय ३० लाख रुपयांवरून ५० लाख रुपये करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

# खालापूर तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी अर्जुन कदम



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या खालापूर तालुका अध्यक्षपदी अर्जुन कदम यांची नुकतीच निवड करण्यात आली असून त्यांना जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

नवर्निवाचित तालुका अध्यक्ष अर्जुन कदम यांनी आपल्या कार्यकाळात खालापूर तालुका कार्यकारिणी घोषित करून पत्रकार संघटनेच्या माध्यमातून जनसामान्यांचे मुद्दे आणि अडचणी सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले तसेच रिक्त झालेल्या पदांवर नवीन नियुक्त्या करण्यात येणार असून काही विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आणि भविष्यातील नियोजनावर पत्रकार व प्रशासनाची बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले.

या वेळी रायगड जिल्हा अध्यक्ष राकेश खराडे यांनी पत्रकार संघटनेच्या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करून खालापूर तालुका अध्यक्ष नियुक्तीचे पत्र अर्जुन कदम यांना देत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. दरम्यान, जिल्हास्तरीय संघटनेच्या जबाबदारीसाठी दिनकर भुजबळ यांना जिल्हा सदस्यत्वाचे नियुक्तीपत्र देण्यात आले. कार्यक्रमास खालापूर तालुक्यातील पत्रकार बांधव उपस्थित होते.

# साहित्यिक रमेश धनावडे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगडभूषण रमेश धनावडे यांच्या 'नादखुळा' पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले. साहित्यसंपदा प्रकाशनतर्फे हे पुस्तक प्रकाशित झाले आहे.

या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, ॲड. प्रसाद पाटील, कामगार नेते दीपक रानवडे, डॉ. चंद्रकांत वाजे, डॉ. राजेंद्र चांदोरकर, उद्योगपती अनिल म्हात्रे, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, लेखक नरेंद्र ठाकूर, रायगड जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, साहित्यिक ॲड. विलास नाईक, साहित्यसंपद प्रकाशनचे संस्थापक वैभव धनावडे, पूनम रमेश धनावडे, महेश कवळे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या वेळी रमेश धनावडे यांच्या काही निवडक कवितांचे वाचन किरण साष्टे व ज्योती बावधनकर यांनी खुमासदार पद्धतीने केले. शुभेच्छापत्र वाचन वैशाली भिडे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश कवळे यांनी बहारदारपणे केले.

या वेळी बोलताना रमेश धनावडे यांनी नादखुळा पुस्तकाचा प्रवास थोडक्यात कथन केला. रमेश धनावडे यांचे यापूर्वी मनतरंग काव्यसंग्रह, ऊर्मी चारोळी संग्रह, जीवनगाणे ललितलेख संग्रह, कवितेच्या सुरातून हा लेखसंग्रह व असेच काहीतरी ही पुस्तके प्रकाशित आहेत.नादखुळा हे त्यांचे सहावे पुस्तक आहे. हा पुस्तक प्रकाशन कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अपूर्वा धनावडे, तेजल धनावडे, पार्थ पाटील, राजेश्री पाटील यांनी परिश्रम घेतले.



# माणगाव पतसंस्थेतील सभासदांच्या यशस्वी पाल्यांचा होणार गुणगौरव

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, उतेखोल ता.माणगाव या संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षातील दहावी-बारावी, पदवी-पदविका, पदवीत्तर, शिष्यवृत्ती प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव सोहळा सलग दुसऱ्या वर्षी लवकरच आयोजित करण्यात येणार आहे.

संस्थेच्या सभासदांनी आपल्या पाल्याच्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत संस्था कार्यालय चौधरी कॉम्प्लेक्स निजामपूर रोड,माणगाव या ठिकाणी १५ जूनपर्यंत सादर करावी असे आवाहन संस्थेचे चेअरमन आनंद यादव यांनी केले आहे.

माणगाव ग्रामीण पतसंस्थेची स्थापना सन १९९८ साली करण्यात येऊन सन १९९९मध्ये संस्थेच्या कामकाजाची खऱ्या अर्थाने सुरुवात करण्यात आली. संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष नुकताच साजरे करण्यात येऊन यंदा इंदापूर शाखा सुरू करण्यात आली आहे. संस्थेतर्फे गुणवंतांचा आदर सन्मान करण्यात येत असतो. या वर्षीही संस्थेतील सभासदांच्या दहावी-बारावी, पदवी-पदविका, पदवीत्तर, शिष्यवृत्ती उत्तीर्ण पाल्यांचा त्यांचे कौतुक म्हणून गुणगौरव सोहळा आयोजित करण्याचा येत असून संस्था सभासदांनी आपल्या पाल्याच्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रतसह संस्थेकडे संपर्क साधण्याचे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.





# आयपीएलनंतर आता कसोटीची रंगत

## इंग्लंड दौऱ्यासाठी टीम इंडिया रवाना

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल संपल्यानंतर भारतीय संघ इंग्लंडमध्ये होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी रवाना झाला आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ पहिलीच कसोटी मालिका खेळणार आहे. या मालिकेला येत्या २० जूनपासून सुरुवात होत आहे. आयपीएलमध्ये दमदार कामगिरी केल्यानंतर आता खेळाडूंकडे आंतरराष्ट्रीय कसोटी क्रिकेटमध्ये आपली क्षमता सिद्ध करण्याची उत्तम संधी असेल.

बीसीसीआयने इंग्लंडला रवाना होण्यापूर्वी भारतीय संघातील खेळाडूंचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. यात ऋषभ पंत, जसप्रीत बुमराह, साई सुदर्शन, रवींद्र जडेजा, अर्शदीप सिंग, मोहम्मद सिराज यांचा समावेश आहे. कुलदीप यादवचे नुकतेच लग्न झाल्याने तो काही दिवसांनी इंग्लंडला रवाना होईल, असे सांगण्यात आले. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेबद्दल खेळाडू खूप उत्साहित दिसत आहेत.

भारतीय संघाचे अनुभवी खेळाडू रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी इंग्लंडविरुद्ध कसोटी संघ जाहीर होण्यापूर्वीच कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. या दोन्ही खेळाडूंच्या अनुपस्थितीमुळे संघात पोकळी निर्माण झाली आहे. ही मालिका खेळण्यासाठी भारतीय संघ युवा आणि काही अनुभवी खेळाडूंसह मैदानात उतरणार आहे. कर्णधार शुभमन गिल आणि भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर खेळाडूंना प्रोत्साहन देत आहेत. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत भारतीय संघात करूण नायर, साई सुदर्शन, शार्दुल ठाकूर यांचाही समावेश करण्यात आला. या खेळाडूंकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे.

## पीयुष चावलाची निवृत्ती

**मुंबई : प्रतिनिधी**



भारताचा लेग-स्पिनर पीयुष चावला याने सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याने शुक्रवारी (दि. ६) इन्स्टाग्राम पोस्टद्वारे याची घोषणा केली. पीयुष २००७चा टी-२० विश्वचषक आणि २०११चा एकदिवसीय विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा भाग होता. त्याने भारतासाठी शेवटचा सामना २०१२मध्ये खेळला.

पीयुषने २००६मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्या वर्षी त्याने मोहाली येथे इंग्लंडविरुद्ध पहिला कसोटी सामना खेळला. त्यानंतर २००७मध्ये बांगलादेशविरुद्ध एकदिवसीय सामन्यात आणि २०१०मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध टी-२० सामन्यात पदार्पण केले.

पुढे पीयुष भारतासाठी केवळ तीन कसोटी खेळू शकला, तर २५ वनडे आणि सात टी-२० सामने टीम इंडियाकडून खेळण्याची संधी त्याला मिळाली. त्याच्या नावावर कसोटीत सात विकेट्स, वनडेमध्ये ३२ विकेट्स आणि टी-२०मध्ये चार विकेट्स आहेत. आयपीएलमध्ये त्याने १९२ सामन्यांमध्ये १९२ विकेट्स घेतल्या. गेल्या वर्षी तो मुंबई इंडियन्स संघाचा भाग होता. तथापि, मेगा लिलावापूर्वी त्याला रिलीज करण्यात आले आणि लिलावात कोणीही त्याला खरेदी केले नाही. यानंतर तो यंदा आयपीएलमध्ये समालोचन करताना दिसला.






## भर पावसात देवघर प्रीमियर लीग उत्साहात



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

पावसाच्या सरींनी निसर्ग डोलायला लागला असतानाच श्रीवर्धनमध्ये क्रिकेटप्रेमींसाठी जल्लोषाने भरलेली एक आगळीवेगळी स्पर्धा रंगली ती म्हणजे देवघर प्रीमियर लीग! दरवर्षी उन्हाळ्यात होणारी ही बहुप्रतिक्षित स्पर्धा यंदा पावसामुळे उशिरा झाली, पण यंदा जो अनुभव मिळाला तो अविस्मरणीय ठरला.

ग्राउंडवर सगळीकडे चिखल आणि पाणी असतानाही आयोजकांनी हार मानली नाही. टेनिस बॉलला बाजूला ठेवून रबरी बॉलने स्पर्धा रंगवली आणि त्यातूनच प्रेक्षकांना आणि खेळाडूंना एक वेगळाच आनंद अनुभवायला मिळाला.

स्पर्धेत प्रथम क्रमांक काळभैरव इलेव्हन, द्वितीय प्रियांश फायटर्स, तृतीय निखिल इलेव्हन, तर चतुर्थ क्रमांक दादा बॉईज संघाने पटकाविला. उत्कृष्ट फलंदाज आणि गोलंदाज म्हणून निवड झालेल्या खेळाडूंना खास ट्रॉफीने गौरवण्यात आले, ज्यामुळे तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. खेळाच्या प्रत्येक टप्प्यावर उत्कंठा वाढवणारे सामने पाहून पंचक्रोशीतील क्रिकेटप्रेमी मंत्रमुग्ध झाले.











## श्रीलंकेच्या माजी खेळाडूवर मॅच फिक्सिंगचे आरोप

**कोलंबो** : श्रीलंकेचा माजी क्रिकेटपटू सचित्रा सेनानायके याच्यावर मॅच फिक्सिंगमध्ये सहभागी असल्याचा आरोपावरून दोषी ठरवण्यात आले आहे. लंका प्रीमियर लीग स्पर्धेतील २०२०मध्ये झालेल्या हंगामात त्याने आपल्या सहकारी खेळाडूला आमीष दाखवण्याचा प्रयत्न केल्याबद्दल हंबनटोटा उच्च न्यायालयाने आरोपपत्र दाखल केले आहे. माध्यमातील वृत्तानुसार सचित्रा सेनानायके या स्पर्धेत खेळत नव्हता. ज्या वेळी ही स्पर्धा सुरू होती त्या वेळी तो परदेशात होता. परदेशातून त्याने मॅच फिक्सिंगसाठी पहिल्याच हंगामात सहभागी झालेल्या दोन खेळाडूंशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. यासह त्याने दोघांनाही मॅच फिक्सिंगमध्ये सहभागी होण्याचे आमिष दिले. सचित्रा सेनानायकेने २०१२ ते २०१६ या कालावधीत श्रीलंकेच्या राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. तो २०१४मध्ये श्रीलंकेच्या टी-२० वर्ल्डकविजेत्या संघाचा भाग होता.











## रोहित शर्मासंदर्भातील प्रश्नावर पंतचे खास उत्तर चर्चेत



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल स्पर्धेनंतर आता भारतीय संघातील खेळाडू पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी इंग्लंडला रवाना झाले आहेत. यासाठी भारतीय संघातील सर्व खेळाडू मुंबईच्या विमानतळावर एकत्रित पोहचले होते. या वेळी उपकर्णधार ऋषभ पंतला रोहित शर्मासंदर्भातील प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्याने दिलेले उत्तर चर्चेचा विषय ठरताना दिसतेय.

पंतसह भारतीय खेळाडू विमानतळावर आत जाण्यासाठी उभे होते. त्या वेळी एका चाहत्याने रोहित शर्मा कुठे आहे? असा प्रश्न पंतला विचारला. यावर त्याने रोहितचा डायलॉग सुनावला 'वो गार्डन में घूम रहे हैं.' सोशल मीडियावर पंतचा हा व्हिडीओ व्हायरल होतोय.

इंग्लंड दौऱ्याआधी भारतीय कसोटी संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा याने निवृत्तीची घोषणा केली होती. त्याच्या जागी आता शुबमन गिलच्या खात्यावर नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आलीये. रोहित मॅचवेळी आपल्या फलंदाजीसह मैदानात कॅप्टन्सी करत असताना खास डायलॉगबाजीसह लक्षवेधी राहिला आहे. खेळाडूंचे मॅचमध्ये लक्ष नसेल तर क्या गार्डन मे घुमने आया है क्या... यासारखे डायलॉग मारत तो खेळाडूला जागे करताना पहायला मिळाले आहे.











दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com